शनिवार, ३ फेब्रुवारी २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १६७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 4 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | YEAR-03 • ISSUE-167 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी व्यवस्थेच्या केंद्रस्थानी

## संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे : ९७ व्या साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**अमळनेर : शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी बसली आहे. हे खूप धोकादायक आहे. तरुणाईचा तुम्ही किती अंत पाहणार आहात. बेरोजगारीचा प्रश्न खूपच गंभीर झाला आहे. बेरोजगारीच्या याच विवंचनेतून शेतकऱ्यांप्रमाणे उद्या तरुणही जीवन संपवू लागले तर ते खापर कुणाच्या माथ्यावर फोडायचे? एक लक्षात ठेवा, तरुणांची ऊर्जा वाहत्या पाण्यासारखी असते. ती जशी सृजनाची गंगोत्री होऊ शकते, तशी तरुणांच्या हिताचे न घडल्यास प्रलयाचे कारणही ठरू शकते, अशा शब्दात संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी थेट सरकारला इशारा दिला.**



९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन शुक्रवारी अमळनेर येथे झाले. यावेळी शोभणे अध्यक्ष पदावरून बोलत होते. लोकसभेच्या माजी अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार, भाषा व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर. राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील. ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, महामंडळाच्या अध्यक्ष उषा तांबे व महामंडळाचे सर्व पदाधिकारी, आयोजक उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. रवींद्र शोभणे म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात आता आपल्याला काहीही करायचे नाही, असे ठरवून सरकारने या क्षेत्राकडे पाठ फिरवली आहे. एकीकडे प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत, तर दुसरीकडे आज हजारो उच्चशिक्षित तरुण प्राध्यापकाची नोकरी मिळवण्याच्या प्रतीक्षेत म्हातारे झाले आहेत. प्राचिन काळी धर्म सर्वोच्चपदी होता. धर्मसत्ताक राज्ये ही धर्माची वेगळी गरज म्हणून निर्माण झाली. पुढे राजसत्तेने धर्मसत्तेचे जोखड झुगारून देत धर्मसत्तेलाच आपल्या अंकित ठेवले. पुढे हाच राजा सर्वोच्च समजला जाऊ लागला, धर्माचा रक्षणकर्ता म्हणून ओळखला जाऊ लागला, इतिहासाची हीच चक्रे आता पुन्हा नव्या रूपाने फिरू लागली आहेत, याकडेही डॉ. शोभणे यांनी आपल्या भाषणात लक्ष वेधले.

**साने गुरुजींच्या स्मारकास निधी देणार :** महाराष्ट्रात अध्यात्म, ज्ञान, तत्वज्ञान रूजविणार अमळनेर हे महत्त्वाचे शहर आहे . राज्याचा सर्वांगिण विकासाबरोबर साहित्य, कला, संस्कृती व क्रीडा क्षेत्रातही शहरांचा विकास झाला पाहिजे . तरच ते शहर श्रीमंत शहर म्हणून ओळखले जाईल . साहित्य संमेलनाला आर्थिक बाबतीत कमतरता पडू नये, याची दक्षता शासनाकडून घेतली जाते . मराठी साहित्य संमेलनास गौरवाशाली परंपरा आहे . तीन वर्षांनी होणारे शंभरावे साहित्य संमेलन दिमाखात पार पडण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार आहे . प्रताप हायस्कूलमध्ये सानेगुरुजींचे सहा वर्ष वास्तव्य होते . साने गुरुजींच्या स्मारकाचा प्रस्ताव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी तयार करावा . या प्रस्तावानुसार साने गुरुजींच्या स्मारकास येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल . साने गुरुजींचे नावाप्रमाणेच भव्य स्मारक झाले पाहिजे . **उपमुख्यमंत्री अजित पवार**

**मराठी भाषा धोरण जाहीर करणार :** मराठी भाषा वेगवेगळ्या राज्यात पोहचविण्याचे काम बृहन्महाराष्ट्र मंडळांने केले आहे . तालुका स्तरावर साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी २ लाख रूपये निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे . या वर्षापासून शाळेत वाचनाचा तास सक्तीचा केला आहे . साहित्य पारितोषिकात शासनाचा हस्तक्षेप नसावा, ही शासनाची भूमिका आहे . साहित्याची चळवळ रूजविण्याचे काम शासनाची चार मंडळ करत आहेत . मराठी धोरण यावर्षी जाहीर करणार आहोत . लवकरच मराठी भाषा धोरण जाहीर करणार आहोत . वाई गावात मराठी विश्वकोश मंडळाची भव्य इमारत बांधण्यात येणार आहे . मराठी युवक मंडळांना पाच हजारांचे अनुदान दिले जाईल . मराठी भाषेच्या विकासासाठी साहित्यिकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या जातील . **शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर .**

**उत्तम साहित्यातून समाजसेवेचे मूल्य :** काळ्या मातीला हिरवा शालू नेसवून आपल्या कवितेच्या माध्यमातून सेवा केलेले कवी ना .धो . महानोर, जीवनाचे मर्म आपल्या अहिराणी रचनेच्या माध्यमातून मांडणाऱ्या बहिणाबाई चौधरी यासारख्यांनी खान्देशचे साहित्य समृद्ध केले आहे . राजकारणातील लोकांना साहित्याचा गंध नसतो असे म्हणता येणार नाही . साहित्यातून समाजात वागावे कसे याची शिकवणूक मिळते . तळागाळातील लोकांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजकारण, समाजकारण केले जाते . उत्तम साहित्यातून समाजसेवेचे मूल्य मिळतात . तुमचं मन शुध्द असेल तर तुम्ही जीवनात अयशस्वी होऊ शकत नाहीत . पुस्तके जगाला जवळ आणण्याचे काम करतात . **उद्‌घाटक सुमित्रा महाजन**

# मोबाईलच्या वापरामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम : कोल्हाळे

आधुनिक केसरी न्यूज



**कोपरगाव :** शाळा पातळीवर मोबाईल ही एक समस्या असून विद्यार्थ्यांना ती विनाशाकडे घेऊन जात आहे. यासाठी शिक्षक-पालकांनी जागरुक राहून या संकटाला सामोरे गेले पाहिजे, असे मत जिल्हा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सयाजी कोल्हाळे यांनी अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले. श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयात कोपरगाव तालुका विधीसेवा समिती आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मोबाईलचा उपयोग मर्यादीत स्वरुपात व योग्य ठिकाणी झाला पाहिजे. लहान मुलांच्या हातात मोबाईल आल्यामुळे अभ्यासात गोडी राहिली नाही. त्यासाठी पालक-शिक्षक व समाजातील घटकांनी जागरुक राहिले पाहिजे. त्यासाठी तालुका विधिसेवा समिती योग्य ते सहकार्य करेल. या कार्यक्रमाच्या संयोजिका सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर स्मिता बनसोड यांनीही मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन पुढे जाणाऱ्या मुलांसमोर एक मोठे ध्येय असले पाहिजे. आता नवनवीन जे गुन्हे होत आहेत त्यामध्ये अल्पवयीन मुले व मुलींचे प्रमाण जास्त आहे, या मुलांची होणारी आयुष्याची दुर्दशा झालेली पाहिली की वाईट वाटते. या कार्यक्रमात कोपरगांव वकील संघाचे अध्यक्ष, विद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड. मनोहर येवले यांनी देखील शाळेतच खरे संस्कार होतात, मी या शाळेत घडलो याचा मला अभिमान आहे, असे म्हटले. या कार्यक्रमात ॲड. अशोक टुपके, सहाय्यक सरकारी वकील, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर कोपरगाव, यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. जिल्हा न्यायालयांचे सहाय्यक सरकारी वकील अशोक वहाडणे यांनी शालेय विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून कसे दूर राहता येईल व आपले ध्येय कसे साध्य करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी वकील संघाच्या सदस्या ॲड. एस. एस. देशमुख, कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कैलास ठोळे यांनी न्यायव्यवस्थेच्या मदतीने या नवतरुण विदयार्थ्यांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारे नवनवीन गुन्हे घडु नये यासाठी संस्था म्हणून आम्ही शिक्षकांच्या माध्यमातुन समाज प्रबोधन करण्यास तयार आहोत याची ग्वाही दीली. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका मिना पाटणी, उपमुख्याध्यापक रमेश गायकवाड, पर्यवेक्षिका उमा रायते तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक वृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश गोरे यांनी तर आभार रघुनाथ लकारे यांनी मानले.

# ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून एक कोटीचा गंडा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** शेअर बाजारात गुंतवणुकीवर भरघोस फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवनू सुमारे एक कोटींची फसवणूक करण्यात आल्याच्या दोन स्वतंत्र घटना जिल्ह्यात उघडकीस आल्या आहेत. आरती होसपुरे यांनी कुलदीप काशीद व त्यांची पत्नी स्मिता काशीद या दोघांविरूद्ध ४३ लाख ८८ हजाराची फसवणुक केल्याची तक्रार दाखल केली आहे. काशीद यांनी के. के. कन्सलटन्सी स्टॉक मार्केट रिसर्च ॲण्ड ॲनालॅसिस या नावाची कंपनी काढून गुंतवणूक दारांना मासिक ७ ते ९ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवले. यामुळे गुंतवणूक दारांनी ५७ लाख ५० हजाराची गुंतवणूक केली. यापैकी परतावा म्हणून १३ लाख ६१ हजार रूपये परत मिळाले असले तरी उर्वरित रक्कम परत केली नाही म्हणून तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# जनतेला लोकप्रिय नाही धोरणात्मक योजना पाहिजे

## सुषमा अंधारे : फडणवीस पक्ष फोडण्यात व्यस्त, खरी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरेंची

आधुनिक केसरी न्यूज


यासीन शेख

लोणार : उल्कानगरी लोणार शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या प्रा. सुषमाताई अंधारे याची मुक्त संवाद यात्रा निमित्ताने लोणार शहरात सभा आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी सरकारचा चांगलाच समाचार घेतला. महिला, युवक, शेतकरी यांच्याशी संवाद साधताना सरकार फक्त लोकप्रिय घोषणा करते लोकांना लोकप्रिय घोषणा नाहीतर धोरणात्मक योजना पाहिजे. धोरणात्मक निर्णय सरकारने घेतले पाहिजे पण सरकारकडे वेळच नाही देवेंद्रजीचा वेळ पक्ष फोडण्यात व घर फोडण्यात जातोय. इतका फुकट वाटण्याचा शोक असेल तर सवंग लोकप्रिय नाही तर धोरणात्मक योजना जाहीर करा जनतेला एक किलो साखर एक किलो पाम तेल नाही तर टाटा, बिर्ला, अडाणी, अंबानी, मालपाणीच्या मुलांना ज्या प्रकारचे शिक्षण मिळतात तशा दर्जाचे शिक्षण आमच्या मुलांना द्या, मराठा विरुद्ध ओबीसीचे भांडण लावण्याचे पाप एकनाथ शिंदे यांनी केले आहे. सरकार म्हणते आम्हाला मराठ्यांना आरक्षण द्यायची नियत आहे तेच सरकार म्हणते ओबीसीला धक्का लागणार नाही आणि त्या सरकार मधील मंत्रि म्हणतो मी हे जमू देणार नाही. आम्ही काय धोतरावर इन करतोय काय? एका सरकारमधील दोन माणसे एकमेकांच्या विरोधात बोलताय तरीही या सरकारमध्ये असतात तर आम्हाला वेड्यात काढू नये.सरकार जाणीवपूर्वक जिल्हा परिषदेच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा खालावत घालवला आहे. जेणेकरून ठेकेनदारांना



देण्यात येईल. कोणी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. आदित्य ठाकरे जेव्हा पर्यटन मंत्री होते तेव्हा सर्वात जास्त निधी मंदिरासाठी आदित्य ठाकरे यांच्या काळात मिळाला. नरेंद्र खेडेकर, जालिंदर बुधवत आणि आशिष राहटे सारखी माणसे दोन पिढ्या स्व. दिलीप रहाटे पासून प्रामाणिक आमच्या सोबत आहे जे संघर्षाच्या काळात सोबत असतात त्यांचा उत्कर्षाच्या काळात कधीच विसरायचं नसतं. २०१८ ची घटना रजिस्टर नाही ती घटना जर अवैध आहे तर तुम्ही लावलेला आमचा एबी फॉम कसा चालतो. मेहकर मतदार संघातील आमदार व बुलढाणा जिल्ह्याच्या खासदाराची सडकून टीका केली. शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जाहीर सभेत प्रसंगी प्रास्ताविक डॉ.गोपाल बशिरे यांनी केली तर शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड,शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हा उपप्रमुख आशिष राहटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हा सहसंपर्कप्रमुख छगन दादा मेहेत्रे, जिल्हा उपप्रमुख बद्रीभाऊ बोडखे, समन्वयक उद्धव कदम, राहुल चव्हाण, युवासेना जिल्हाप्रमुख नंदुभाऊ कराडे, बुलढाणा तालुका प्रमुख लखन गाडेकर, सिंदखेड राजा तालुकाप्रमुख महेंद्र पाटील, मेहकर तालुकाप्रमुख लिंबाजी पांडव शहर प्रमुख किशोर गारोळे, लोणार तालुकाप्रमुख दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, कृउबास संचालक विजय मोरे, तेजराव घायाळ, तालुका उपप्रमुख श्रीकांत नागरे, परमेश्वर दहातोंडे, नगरसेविका सिंधुताई जाधव, युवा सेना तालुकाप्रमुख जीवन घायाळ, शहर प्रमुख श्रीकांत मदनकर, महिला संघटिका संजीवनी वाघ, श्याम राऊत, तानाजी मापारी, सुदन अंभोरे, कैलास अंभोरे, राजू बुधवत, आश्रुबा धारकर, लालूभाई मुल्लाजी, वसीम शेख, बंडूभाऊ जोगदंड महाविकास आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन विधानसभा संघटक गणेश बोचरे तर आभार तालुकाप्रमुख दीपक मापारी यांनी मानले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सारे जहाँ से अच्छा...

आधुनिक केसरी

आपल्या साऱ्यांचे हे भाग्य आहे की, या भारतभूमीत आपला जन्म झाला. गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी आदी नद्यांच्या जलाने पावन झालेला हा प्रदेश हिमालयाचा रुपेरी मुकुट या भारतमातेने परिधान केला आहे. सागर तिच्या पायाला स्पर्श करतो आहे. कन्याकुमारी येथे तिन्ही सागरांचं जल एकमेकांत मिसळलेले आपणास दिसतं. त्या समुद्रात जो खडक आहे. ज्यावर स्वामी विवेकानंद बसले होते, त्या खडकावर सागराच्या लाटा सतत येऊन अभिषेक करीत असतात. जणू सागराचीही देशभक्ती उचंबळून येते आणि लाटांच्या रूपात तो भारतमातेला जलाभिषेक करतो. तिथूनच स्वामी विवेकानंदांना प्रेरणा मिळाली. आपलं जीवनध्येय गवसलं. सागराची हाक आणि रामकृष्ण परमहंसांचे आशीर्वाद यांचा संगम झाला आणि नरेंद्राचं रूपांतर स्वामी विवेकानंदांत झालं. भारतीय संस्कृती जगाला कळली, ती स्वामी विवेकानंदांच्या रूपाने. याच विवेकानंदांनी 'देश हाच आपला देव आहे. त्याचीच पूजा करा असा प्रेरणादायी संदेश तरुणांना दिला. इंग्लंडमध्ये असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांचं हृदय मातृभूमीच्या आठवणीनं उचंबळून आलं. सागराच्या सान्निध्यात बसले असताना त्यांच्या ओठी शब्द आले, 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला... हे देशप्रेम! जन्मठेपेची शिक्षा झाली, तेव्हा देशासाठी तुरुंगात अपार कष्ट, यातना सहन केल्या. कोलू चालवला. चाफेकरांना जेव्हा इंग्रजांनी फाशीची शिक्षा दिली, तेव्हा सावरकर म्हणाले, "स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फासावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीने जाता-जाता चेतविलेली शत्रुजयवृत्ती, महाकुंडात समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणं असेल, तर त्याचं दायित्व आपल्यावर आहे. देशाचं स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मारता मारता मरेतो झुंजेन." चाफेकरांनी जेव्हा देशासाठी बलिदान दिलं, तेव्हा स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एक पोवाडा लिहिला. त्याने तरुणांना त्या काळात अतिशय स्फूर्ती दिली. स्वजनछळाते ऐकुनी होती तप्त तरुण जे अरुण जणो देशासाठी प्राण देती धन्य धन्य त्या का न म्हणो शतावधी ते जन्मा येती मरोनी जाती ना गणती देशासाठी मरती त्यासी देशपिते की बुध म्हणती.' अशा अनेक क्रांतिवीरांचं, देशभक्तांचं देशाच्या स्वातंत्र्ययज्ञात बलिदान पडलं. म्हणून तर सिद्धहस्त कवी ग. दि. माडगूळकर लिहून गेले, 'वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम् अनेक क्रांतिकारक 'वंदे मातरम् म्हणत हसत-हसत फासावर चढले.






## आनंदी पहाट

# संस्कार हे संस्कृतीनेच प्राप्त होतात

आधुनिक केसरी

विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. खरे तर, संस्कार संस्कृतीनेच प्राप्त होत असतात. त्याचप्रमाणे, संस्कृती सुद्धा, संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## चिंतामुक्त झाला | भाग्यवंत ||

रात्रंदिन आम्हा | विठ्ठलाचा ध्यास ||
संत सहवास | निरंतर ||१||
ध्यानी मनी स्वप्नी | वैष्णवांचा वास ||
सत्कर्माची कास | धरू आम्ही ||२||
विठोबाची आन | वाहिली तुकाने ||
जपला जीवाने | राम कृष्ण ||३||
अभंगाशी नाते | साधले ओवीने ||
जाणले जीवाने | मर्म एक ||४||
घ्यावा सावकाश | येथे ब्रह्मानंद ||
विठ्ठल गोविंद | अन्य नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्मयोनि ।
तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढे ॥५६॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्वगुणपरीक्षानाम समास पाचवा ॥५॥
तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण ।
श्रोतीं करावें श्रवण । यकाग्र होऊनी ॥१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

वाल अग्र दस सहस के,
भाग करे अनुमान ।
राई दसवाँ भाग में, आतम रुप पिछान
।।२८।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल षष्ठ
अध्याय) ०२/०६/२८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : केसाच्या टोकाचा दहा हजारवा भाग हे आत्म्याचे स्वरूप आहे असे ऋषींनी अनुमान केले आहे तसेच राईचा दहावा भाग आत्म्याचे स्वरूप असल्याचे सांगितले आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

ओढे नदीनाले सर्व गंगेला मिळतात पण !!



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

एकदा गंगेला मिळालेला ओढा परत वेगळा काढून शकत नाही. जसा साधुसंतांचा आत्मा सर्वत्र असतो जगाच्या कल्याणासाठी त्यांचा जन्म झालेला असतो. जगात सोने व लोखंडाला तेवढेचं महत्व आहे.कनक म्हणजे सोने आणि लोखंड दोघांचाही सहभाग तितकाच मोलाचा आहे. पण सोन्याला राजदर्जा आहे तर लोखंडाला दुय्यम स्थान दिले गेले आहे. आपण गाढ झोपेत असताना भितीदायक स्वप्न पडते तेव्हा जागा असलेला माणूस आपल्याला सांगतो की हे भय आहे. जाग्या माणसाला भयाची डर नसते. एक पूर्ण पणे व्यापलेला तर दुसरा निर्भय असतो. झाडाच्या फांदीला एक जण साप म्हणतो कारण तो घाबरलेला असतो पण निडर माणूस ती फांदी हातात धरून दूर फेकून देईल. जो आत्मस्वरूपात एकरूप झाला त्याला संपूर्ण निर्भयता येते.तो सतत समर्पित जीवन जगतो. पण अज्ञानी अडाणी माणसाला सतत जन्ममरणाचे भय रहाते. मनुष्य जन्माला आले आहे सतत परोपकार केला सद्सद्विवेक जागृत ठेवला. धर्म, समाजसेवा,धर्माचे वचनावर जीवन जगले तर,धर्माच्या चौकटीत स्वतः ला बांधून घेतले तर जन्ममरणाच्या फे-यातून मुक्त होता येते. त्यासाठी गरज आहे विवेकाची. श्रीराम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ समास तिसरा समाप्त.


## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

आपल्यासाठी लाखोंचं भक्तिस्थान असलेलं सारसर्वस्व विठ्ठलाचं राऊळ उद्ध्वस्त व्हावं हे तिला सहन होणं शक्यच नव्हतं. कान्होपात्रा सेनाधिकाऱ्यासमोर हजर झाली. तिने एकवार विठ्ठलाचं दर्शन घेण्याची परवानगी मागितली. कान्होपात्रा तडक देवासमोर हात जोडून उभी राहिली. देवापासून दूर जाण्याची कल्पना तिच्यासाठी असह्य होती. ती देवाला म्हणाली, नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वस्व फुटो पाहे ।। हरिणीचे पाड व्याघ्रे धरियले । मजलागी जाहले तैसे देवा ।। तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे वो जननी विठाबाई ।। मोकलूनी आस, झाले मी उदास । घेई कान्होपात्रेस हृदयास ।।


# आपण भगवंतासाठीच आलो आहोत

आधुनिक केसरी



आपण स्वप्नात असतो तोपर्यंत स्वप्नच खरे आहे असे वाटते. त्याचप्रमाणे जोपर्यंत भगवंताचे सत्यत्व आपल्याला नीट समजत नाही, तोपर्यंत हे सर्व मिथ्या असणारे जग आपण भ्रमाने सत्यच मानीत असतो. जे चिरकाल राहते तेच खरे सत्य होय. आपला मार्ग चुकला आहे एवढे जरी समजले तरी सत्याकडे जाता येते. मन विषयाकडे लावून नाही समाधानाचा अनुभव येणार. समाधान जिथे भंगते तो मार्ग खास चुकीचा आहे. मुंगळा गुळाच्या खड्याला चिकटतो, मान तुटली तरी सोडीत नाही. त्याचप्रमाणे, आपण विषयसुख सोडीत नाही, याला काय करावे ? जे अनुभवाने खरे शहाणे होतात ते या विषयसुखाचा त्याग करतात; आणि ज्यांची ही विषयाची आसक्ती सुटली त्यांनाच ते मिथ्या आहे हे प्रत्ययाला येते. आपले समाधान का बिघडते ? आज आहे त्यापेक्षा निराळे असावे असे वाटते म्हणून ! जो जिन्नस जिथे ठेवला आहे ती जागा सोडून आपण त्रिभुवन जरी शोधले तरी तो सापडत नाही; त्याप्रमाणे ज्या वस्तूमध्ये समाधान नाहीच त्यामध्ये कितीही शोधले तरी ते आपल्याला मिळत नाही. समाधान फक्त भगवंताजवळ आहे. खरे म्हणजे आपली वृत्ती परिस्थितीत अडकलेली असल्यामुळे ती स्थिर राहात नाही; म्हणून आपल्याला समाधान नाही. मनुष्य आहे त्या स्थितीला कंटाळून, सुख मिळावे यासाठी जे करायला जातो ते शेवटी दुःखाचेच होते, म्हणून, आहे त्या परिस्थितीत समाधान मानायला शिकावे. आपण ज्या कार्यासाठी आलो, ते कार्य झाले की समाधान होते. मग जोपर्यंत आपल्या कृतीने आपल्याला समाधान होत नाही तोपर्यंत, आपण त्या कार्यासाठी आलो नाही असे म्हणायला काय हरकत आहे ? आपण भगवंतासाठीच आलो आहोत आणि त्याच्या प्राप्तीमध्ये आनंद आहे. जगातली कोणतीही दृश्य वस्तू आपल्याला मनाचे स्वास्थ्य देऊ शकत नाही, किंवा ते नेऊ शकत नाही. मन भगवंताजवळ गुंतेल तेव्हाच स्वास्थ्य मिळेल. त्याकरिता नेहमी भगवंताचे नामस्मरण करावे, त्याचे गुणवर्णन ऐकावे, त्याच्याशिवाय दुसरी गोष्ट काढूच नये. मिथ्या समजून प्रपंच करावा आणि भगवंताचे होऊन राहावे. नामाच्या उलट सांगतील त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. कोरडा वेदान्त ऐकू नये. प्रत्येक नामागणिक भगवंताची आठवण होते. म्हणून नामच सर्वस्व मानावे. नामात काय आहे, ते घेतल्यानेच सर्व काही कळून येते. तीर्थक्षेत्रात किंवा संतांच्याकडे जाऊन वस्तू मिळवायची नसून समाधान मिळवायचे असते, आणि हे नामस्मरणाच्या योगानेच घडून येते. **२३८. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ३ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari



# सोबलगाव तलाव कोरडा, पाणीसाठा जिरला

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील तलाव कोरडे झाल्याचे चित्र आहे.तालुक्यात वर्ष- २०२३ पावसाने सरासरी ही ओलांडली नसल्याने तलावात नाममात्र पाणी साठा शिल्लक होता परंतु शेवटच्या टप्प्यात क्षेत्रात काही ठिकाणी परिसरात ढगफुटी व जोरदार पाऊस झाल्याने तलावात पाणी साठा वाढला होता.तदनंतर मात्र पावसाने पाठ दाखविल्याने पाणी साठा वाढण्या ऐवजी बाष्पीभवन व जागीच जिरल्याने तलावामधील पाणी साठा एकदम कमी झाला.तर सद्या पाणी साठा शेवटची घटका मोजत आहे.ठिकठिकाणी पाण्याचे ठिकोळे दिसून येत आहे.म्हणजे तलाव प्रकल्प कोरडे पडले असल्याचे चित्र आहे.गत दोनतीन वर्षांपासून प्रकल्पांत पावसाअभावी पाणी साठा होत नाही.कारण प्रकल्पाच्या क्षेत्रातच पाऊस होत नाही.सोबलगाव शेखपूर इंदापूर सावंगी शिवारात या प्रकल्पाचे पाणी सिंचनासाठी वापराला जातो परंतु पावसाअभावी गत दोनतीन वर्षांपासून प्रकल्पात पाणी साठा शिल्लक रहात नसल्याने शेती सिंचनासाठी पाणी साठा उपलब्ध होत नाही व आतातर प्रकल्पच कोरडा पडला आहे.

## निराशाजनक अर्थसंकल्प : भुतेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी



नुकताच सादर केलेला अर्थसंकल्प हा शेती आणि शेतकऱ्यांसाठी अत्यंत निराशाजनक असल्याचे मत भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी व्यक्त केले आहे. केंद्राने सादर केलेल्या अर्थसंकल्पाविषयी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून वेगवेगळी मतमंतारे व्यक्त केली जात आहेत. त्या अनुषंगाने हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी कसा असेल ? असा प्रश्न उपस्थित केला असता ते आधुनिक केसरीशी बोलत होते.

पुढे बोलताना भुतेकर म्हणाले की, मोदी सरकारच्या अर्थ मंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेला अर्थसंकल्प देशातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणारा अर्थसंकल्प आहे. कच्च्या आणि रिफाइन्ड तेलाची इतिहासातील विक्रमी आयात करून तेल बिया उत्पादनात अत्मनिरभर होण्याचा संकल्प कसा पुर्ण होणार हे न उलगडणारे कोडे आहे. पीक वीमा म्हणजे 'भीक नको कुत्रे' आवर म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतकरी आत्महत्या थांबवने, शेतमालाच्या आयातीवर निर्बंध लादने, कृषीपंपाला मोफत व मुबलक वीज प्रदान करण्या सोबत अनेक विषयाला अर्थसंकल्पात हात घालने गरजेचे होते. शेतकऱ्यांकचा भ्रमनिरास या अंतरिम अर्थसंकल्पाने केला आसल्याची प्रतीक्रीया भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी दैनिक आधुनिक केसरीला दिली आहे.



## 'आरडीएसएस'सह विविध योजनांची कामे दर्जेदार व मुदतीत पूर्ण करा : रेशमे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** संशोधित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतील विद्युत विकासाची कामे दर्जेदार व निर्धारित मुदतीत पूर्ण करा, असे निर्देश महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर व जालना येथे शुक्रवारी (2 फेब्रुवारी) झालेल्या बैठकामध्ये रेशमे यांनी आरडीएसएस योजनेतील वाहिनी विलगीकरण, कुसुम-ब योजना, रिॲक्टिव्ह पॉवर कॉम्पेन्सेशन व प्रधानमंत्री सूर्योदय योजनेसंदर्भात आढावा घेतला. यावेळी मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे, अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) बीना सावंत, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, जालना मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय सरग यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कंत्राटदार एनसीसी व श्रीम कॅपॅसिटरचे प्रतिनिधीही बैठकीस हजर होते. योजनांत माईलस्टोनप्रमाणे किती कामे झाली, त्यात येणारे अडथळे, त्यावरील उपाय यावर चर्चा झाली. कोणत्याही योजनेच्या कामाच्या गुणवत्तेबाबत तडजोड करू नका, अशा स्पष्ट सूचना रेशमे यांनी कंत्राटदारांना दिल्या.

प्रधानमंत्री सूर्योदय योजनेत जिल्ह्यासाठी 25 हजार ग्राहकांना रूफ टॉप सोलर देण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच विविध योजनांच्या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रेल्वे, वन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध खात्यांशी समन्वय साधून ना-हरकत तातडीने प्राप्त करावी. तसेच वाहिनी विलगीकरणासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-2.0 मध्ये निवड झालेल्या उपकेंद्रांना प्राधान्य द्यावे. तसेच जे शेतकरी कृषिपंप जोडणीसाठी पैसे भरून प्रलंबित आहेत, अशा शेतकऱ्यांना कुसुम-ब योजनेतून सौर कृषिपंप घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही रेशमे यांनी केले.



## विद्यार्थ्यांनी घडवले संस्कृतीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** साधना पाटील प्राथमिक विद्यालय,नरसिंगपूर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन गुरुवारी उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर महाराष्ट्रासह देशातील विविध संस्कृतीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीरामा'च्या रामायण नाटिका व गीताचे सादरीकरण करताच शाळेचा परिसरात जय श्रीराम या नावाचा एकच जयघोष झाला. साधना पाटील विद्यालय येथील सकाळ सत्रातील सामान्य ज्ञान परीक्षेचे उद्घाटन उद्योजिका तथा समाजसेविका उर्मिला मनोज पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रभाकर मनगटे, प्राइड एज्युकेशनचे संचालक सतीश शर्मा, बीट कॅम्पुटर संचालक अर्जुन दळवी यांची उपस्थिती होती. तसेच सकाळ सत्रातील आनंदनगरी कार्यक्रमाचे उद्घाटन जयप्रकाश नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय टीला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, संस्थेचे संचालक शाम कदम, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विलास बनसोडे, शाळा समिती अध्यक्ष अमिन शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या शुभांगी केतन काजे, उर्मिला मनोज पवार, युवा उद्योजक तथा समाजसेवक इंद्रजीत चव्हाण यांच्या हस्ते झाले. साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव टी.एस.कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक नितीन पाटील, संस्था प्रतिनिधी हर्षदा कदम, समाजसेवक आकाश बोलधने, रिठ्ठी-मोहार्ड सरपंच ताराबाई राठोड, सामाजिक कार्यकर्ते अशोक वाहुळ, सातदिवे पेट्रोलियमचे संचालक अजय सातदिवे, सीतानाईक तांडा माजी सरपंच मिराबाई अमरसिंग राठोड, एम आय एम तालुकाध्यक्ष सलीम शाह, केंद्र संयोजक प्रा.योगीराज सोमवंशी, प्रा.सुनील नागे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात साधना पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र पवार बोलताना म्हणाले की, पारंपरिक शिक्षणाला अद्ययावत शिक्षणाची जोड देऊन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी शाळेतर्फे नेहमी वर्षभर विविध राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थित मान्यवरांना व पालकांना दिली.

## सांगलीत हळदीला ३१ हजारांचा उच्चांकी दर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** यंदाच्या हंगामातील नवीन हळदीला मुहुर्ताच्या



सौद्यामध्ये सांगली बाजारात क्विंटलला 31 हजाराचा उच्चाकी दर मिळाला. नवीन हंगामातील हळदीचे सौदे शुक्रवारी शुभारंभाने जिल्हा बँकेच्या उपाध्यक्षा जयश्री पाटील यांच्या हस्ते व सभापती सुजयनाना शिंदे यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आले. गणपती जिल्हा सेवा सोसायटीमधून हळद सौदे सुरू करण्यात आले. जय श्रीराम ट्रेडिंग कंपनीच्या अडत दुकानात राजेंद्र आनंदराव पाटील या शेतकऱ्याच्या राजापुरी हळदीला क्विंटलला ३१ हजाराचा दर मिळाला. दिलीप ट्रेडर्स या खरेदीदारांने ही हळद उच्चांकी बोलीने खरेदी केली. आजच्या सौद्यासाठी बाजारात एक हजार २३ पोती आली होती. सौद्यामध्ये किमान दर १० हजार ५०० तर कमाल ३१ हजार असा होता. सरासरी दर १५ हजार रूपये प्रतिक्विंटल होता. सांगली बाजार समिती ही हळदीच्या खरेदी-विक्रीसाठी देशात प्रसिद्ध असून शेतकऱ्यांनी त्यांचा शेतीमाल खुल्या सौद्यामध्ये विक्रीसाठी वसंतदादा मार्केट यार्ड सांगली येथे जास्तीत जास्त आणावा. असे आवाहन बाजार समिती सभापती शिंदे यांनी केले.

# किशोरांची आकडेमोड

आधुनिक केसरी

आगामी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून पूर्ण बहुमताचा दावा करण्यात येत आहे. मात्र, त्याचवेळी विरोधकांच्या इंडिया आघाडीकडून भाजपाच्या सत्ताकाळात घडलेल्या घडामोडींचा दाखला देत यावेळी भाजपा सत्तेतून बाहेर पडेल, असा दावा केला जात आहे. या परस्परविरोधी दाव्यांमध्ये नेमके लोकसभा निवडणुकांचे चित्र कसे असेल? याविषयी राजकीय विश्लेषकांमध्ये सध्या मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी 'इंडियन एक्स्प्रेस अड्डा'मध्ये बोलताना लोकसभा निवडणुकांच्या रणनीतीवर भाष्य केले आहे. भाजपाच्या हिंदुत्वाला नेमके विरोधकांनी काय उत्तर द्यायला हवे, यावर प्रशांत किशोर यांनी आकडेवारी मांडली आहे. भाजपाच्या हिंदुत्ववादाच्या भूमिकेला विरोधकांकडून किंवा काँग्रेसकडून कशाप्रकारे सध्या उत्तर दिले जात आहे, याचा उल्लेख होताच प्रशांत किशोर यांनी विरोधकांची ही पद्धतच चुकीची ठरवली आहे. यासाठी त्यांनी भाजपाला मिळणारी मतांची आकडेवारी व विरोधकांसाठी उरलेली मतांची आकडेवारी सादर केली. आपण लाकडासाठी आख्खे जंगल घालवून बसतोय. दिल्लीत बसलेल्या अनेकांना हिंदुत्व वगैरेच्या संकल्पनांची भुरळ आहे. आपण तथ्थ्यांवर बोलुयात. जे भाजपाच्या हिंदुत्वावर विश्वास ठेवतात, जे मोदींचे चाहते आहेत, ते त्यांच्याबरोबर आहेत हे आपण मान्य करुयात. संस्था, विचारसरणी असे सगळे त्यांच्याबरोबर आहे. पण हे सगळे एकत्र केले तरी त्यांचे प्रमाण फक्त ३८ टक्के आहे. भाजपाला मतदान करणाऱ्या मतदारांचे प्रमाण फक्त ३८ टक्के आहे. त्यामुळे (२०१९मध्ये) हिंदुत्व, विचारसरणी, संघटनात्मक ताकद, सत्तेची ताकद असूनही ६२ टक्के मतदार भाजपाच्या विरोधात होते. त्यामुळे इथे खरं आव्हान हे आहे की या उरलेल्या ६२ टक्क्यांपैकी बहुमत विरोधकांना आपल्या बाजूने कसं वळवता येईल, असे प्रशांत किशोर म्हणाले. याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन हा आहे की हे सगळे ६२ टक्के (मिळणारे पक्ष) एका खोलीत एकत्र येतील आणि त्यांना ६२ टक्के मतं मिळतील. हेच सध्याच्या इंडिया आघाडीबाबत घडत आहे. पण याचा फायदा होणार नाही. तुम्हाला फक्त पक्ष एकत्र आणून भागणार नाही. तुम्हाला त्यांच्यात एकवाक्यता आणावी लागेल. त्यांच्या प्रचाराच्या बाबतीत, त्यांच्या धोरणांच्या बाबतीत. फक्त पक्षांमधल्या लोकांना एकत्र आणल्यामुळे तुम्हाला ६२ टक्के मिळणार नाहीत, असे म्हणत प्रशांत किशोर यांनी इंडिया आघाडीच्या मूळ धोरणावरच आक्षेप घेतला. भाजपाविरोधात लढणाऱ्या किंवा लढण्याचा प्रयत्न करणाऱ्या कुणाला जर मी सल्ला देत असेन, तर मी एवढंच सांगेन की त्या ३८ टक्क्यांमध्ये आणखी २ टक्के मिळवून असे गृहीत धरा की ४० टक्के मतदार तुम्हाला मतदान करणार नाहीत. पण तरीही ६० टक्के मतं तुमच्यासाठी राहतात. ६० टक्क्यांपैकी ६० टक्के मतं मिळवण्यासाठी प्रयत्न कसे करता येतील हे विरोधकांनी पाहायला हवे. त्यानंतर ३६-३७ टक्के मतं तुम्हाला मिळतील, असे गणित यावेळी प्रशांत किशोर यांनी मांडले.

# वेगळे राहणाऱ्या पत्नीची पोटगीच रद्द


राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**वर्तमान कुटुंब व्यवस्थेत सुनेकडून सासु-सासऱ्याचा होणारा छळ किंवा त्यांच्यापासुन वेगळं रहाण्यासाठी लावलेला मेळ असे आवाहन समाजासमोर जास्तीचे पुढे येत असताना सासु-सासऱ्याची सेवा किंवा वृद्ध आजी सासऱ्याचीही सेवा करणं आपल्या देशातील सांस्कृतिक प्रथा आणि महिलांच्यासाठी घटनात्मक बंधन असुन पतीच्या कुटुंबापासुन वेगळं रहाण्याचा पत्नीचा आग्रह चुकीचा आणि अवास्तव असल्याचे सांगत झारखंड उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती सुभाषचंद्र यांनी एका प्रकरणात पत्नीची पोटगीच रद्द करून टाकली. दरम्यान या निकालाचा चांगला परिणाम कुटुंब व्यवस्थेवर होवुन वृद्ध सासु-सासऱ्यांना निश्चित दिलासा मिळेल हे मात्र नक्की.**

भारतीय संस्कृती आणि कौटुंबिक आपलेपणा हे खरं तर समाज जीवनातल्या व्यवस्थेचा अलंकार म्हणावा लागेल. एकत्र कुटुंब पद्धती आदर्श म्हणुन याच देशात पारंपारिक रूढी, परंपरेनुसार पुढे आली होती. पण परिवर्तनाच्या युगात विशेषतः नविन पिढीत विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणावर रूढ होताना दिसते ज्यामुळे वृद्धापकाळात अनेकांचे जगणेच मुश्किल झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिताना प्रत्येक माणसाचे कर्तव्य आणि जबाबदारी याचा किती बारकाईने विचार केला? अशा निकालातून वाचल्यानंतर कळुन चुकते. सत्तर वर्षापुर्वी भविष्यात असं घडु शकतं हा दृष्टिक्षेप लक्षात घेवुन घटनेची निर्मिती झाली हे तितकंच खरं. वर्तमानकाळात विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणावर प्रबळ झाली. ज्यामुळे पोटच्या लेकरांना देखील जन्मदात्याचा विसर दुर्दैवाने पडु लागला. समाजात असे अनेक टोणगे ज्यांना आपल्या माता-पित्यापेक्षा पत्नीचा आवाज श्रेष्ठ वाटतो. या देशात वृद्धाश्रम काढावे लागणं हेच फार मोठं दुर्दैव म्हणावे लागेल. खरं तर आपण कुणामुळे आहोत? याचं भान जरी पुरुषकर्त्याला वेळप्रसंगी झालं तर पत्नीच्या बोटावर तो नाचणार नाही हे तितकंच खरं, वास्तविक पहाता पत्नी म्हणुन वावरणाऱ्या महिलांनी देखील आपल्याला आई- वडिल आहेत याची जाणिव ठेवायला हवी. मात्र चंगळवादाच्या भोगात जास्त पिढी भरडत जात असल्याने एक प्रकारची धुंदी आणि नशा फार मोठे आवाहन म्हणुन समाजात पुढे येताना दिसते. नाही म्हटलं तरी आज २९ टक्के मुलं आपल्या आई-वडिलांना सांभाळ करत नाहीत. एव्हाना त्यांची दखल देखील घेत नाहीत. त्याची कारणं वेगवेगळी असली तरी शेवटी सुन या घटकाकडेच संशयाची सुई गेल्याशिवाय रहात नाही. वास्तविक पहाता ज्या घरात सुनेला सासु-सासरे हेच आपलं दैवत आणि आई-वडिल असं मनातुन वाटतं आणि सुन देखील सासु-सासऱ्यांना लेकी समान वाटते त्या कुटुंबात खऱ्या अर्थाने रामराज्य पहायला मिळाल्याशिवाय रहात नाही. असे अनेक कुटुंब आपल्याकडे आदर्श देणारे देखील पहायला मिळतात. मुलं आई-बापाला सांभाळत नाहीत. त्यासाठी कायद्याचा बडगा दाखवावा लागतो हे खरं दुर्दैव म्हणावे लागेल. मात्र एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ज्यांच्या कुटुंबात जन्मदात्या माता-पित्यांची परवड होते, त्या लेकराचे संसार सुखाने चालुच शकत नाहीत हे त्रिवादी सत्य म्हणावे लागेल, वेगवेगळ्या संकटाचा सामना त्यांना करावा लागतो. सुख-दुःखाचाही संघर्ष होतो. कारण नशिबाची साथ मिळत नाही ती केवळ माय-बाप सांभाळत नसल्यामुळेच. आपले आई-वडिल हेच खरे आपले परमेश्वर हा दृढभाव मनात जर ठेवला तर कुठल्याही गोष्टीची कमतरता भासत नाही. अलीकडे स्वार्थाशिवाय कुणीही फुकट प्रेम करत नाही. पण आई-वडिल असं एकच व्यासपीठ ज्यांचं प्रेम लेकराला बिनापैशाचं मिळतं त्यासाठी पैसा मोजण्याची गरजच नाही. मुळात प्रश्न असा पडतो की, कुणाच्या तरी सांगण्यावरून किंवा आपल्या अहमपणावरून आई-वडिल आपण घराबाहेर काढतो? अशा बाईलबुध्यांना आनंद कधीच मिळु शकत नाही. माणसानं राग कुठेही



काढावा? पण आपल्या जन्मदात्यावर राग काढणे हा फार मोठा संसारिक गुन्हा समजावा लागेल. ज्यांचे आई-वडिल जिवंत पण आपण त्यांचा सांभाळ करत नाहीत तर अशा वेळी या धेंडांना घास गोड लागतोच कसा? असो. अनेकांच्या कुटुंबात अनेक प्रश्न वेगवेगळ्या पद्धतीने पुढे येताना दिसतात. मला सासु-सासरे नकोच म्हणत अनेक कुटुंबात सुना घटस्फोट घेवुन बाजुला होतात पण पोटगीचा दावा चुकत नाहीत. असाच एका प्रकरणात झारखंड उच्च न्यायालयाने निकाल देताना वृद्ध सासु-सासरे किंवा आजी सासऱ्याची सेवा करणं हे भारतीय सांस्कृतिक प्रथा आणि कुटुंब व्यवस्थेत महिलांच्यासाठी घटनात्मक बंधन असुन त्यांच्यापासुन वेगळं रहाण्याचा पत्नीचा आग्रह अवास्तव असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले असुन चक्क पत्नीची पोटगीच रद्द करणारा निकाल दिला.

रूद्रनारायण रे आणि पियाली रे चटर्जी या कुटुंबात वाद सुरू होता. त्याच्या बायकोला वृद्ध आई आणि आजी सेवा करणे आवडत नव्हते. वेगळं रहाण्यासाठी नवऱ्यावर दबाव टाकत होती. त्यासाठी पत्नी पियाली रे हिने न्यायालयीन विभक्तीचा दावा दाखल केला. त्यावेळी पत्नीला दरमहा तीस हजार देण्याचे निर्देश जिल्हा सत्र न्यायालयाने सुरूवातीला या प्रकरणात नारायण रे यांना दिले होते. या निकालाविरूद्ध पती रूद्र नारायण यांनी उच्च न्यायालयात आवाहन दिले. घटनेच्या कलम ५१ अ (एफ) नुसार सांस्कृतिक वारसा आणि मुल्यांचे जतन करणे हे नागरिकांचे मुलभुत कर्तव्य आहे असे न्यायालयाने म्हटले. पतीच्या आईची आणि आजीची सेवा करणे कर्तव्य असुन त्यांच्यापासुन वेगळं रहाण्याची मागणी अवास्तव असल्याचे सुभाषचंद्र न्यायमुर्ती यांनी निकाल देताना सांगितले. शिवाय या प्रकरणात पतीने न्यायालयीन विभक्तीसाठी दावा केला होता, घटस्फोटासाठी नाही यावरून पतीला पत्नीसोबत रहायचं आहे, पत्नी उगच वाजवी कारण नसताना वेगळं रहाण्याचा आग्रह धरते असं देखील न्यायालयाने म्हटले. एवढंच नव्हे तर २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयाचा संदर्भ दिला, पतीला कुटुंबापासुन विभक्त होण्यासाठी पत्नीचे सततचे प्रयत्न हे खऱ्या अर्थाने कुरता असल्याचे म्हटले. खरं पाहाता, हा निकाल जन्मदात्याला न सांभाळणाऱ्या धेंडासाठी डोळ्यात अंजण घालणारा असुन, अशा कुर पत्नीला देखील त्यांची जागा दाखवुन देणारा वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाच्या जीवाचं रक्षण होण्यासाठी कशा प्रकारे आदर्श घटना लिहुन ठेवली? ज्याचा वर्तमानकाळात पावलोपावली उपयुक्त आधार कसा घेता येतो? याचं हे उत्तम उदाहरण आहे. कुटुंब व्यवस्थेत आई-वडिलांचा सांभाळ असो किंवा सुनेनं सासु-सासऱ्याचा सांभाळ करणे असो यासाठी कायद्याचा आधार घेणं आणि भांडण कोर्टापुढे घेवुन जाणं हेच खऱ्या अर्थाने प्रत्येकाच्या आयुष्यातलं फार मोठं दुःख समजावे लागेल. कुटुंब व्यवस्थेची वाढत असलेली ही विभक्तवादाची दरी आणि जन्मदात्या आई-वडिलांची होणारी परवड लक्षात घेवुन मागच्या दहा वर्षापासुन मी स्वतः सरकारला शासकिय कर्मचाऱ्यांच्या पगारातुन १५ टक्के पगार आई-वडिलांच्या नावे परस्पर बँकेत जमा करणारा कायदा करण्याची मागणी केलेली असुन त्याची जागृती हळुवार मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. अनेक ग्रामपंचायतीत तशा प्रकारचे ठराव देखील पुढे येताना दिसतात.

# संत तुकारामांचा समतावादी दृष्टिकोन

**(मागील अंकावरून)** वर्तमानकाळ असो,भूतकाळ असो की भविष्यकाळ असो या तिन्ही काळात संत तुकारामांचे अभंग हे तंतोतंत लागू पडतात. या विषमतावादी असलेल्या व्यवस्थेत संत तुकाराम जगाला पटवून देतात की, सर्व जग हे विष्णूमय आहे आणि त्यात जर आपण भेदाभेद केला तर तो अमंगळ आहे.ते आपल्या अनुयायांना जे हिताचे असेल तेच करायला सांगतात.तसेच आपल्याकडून कोणत्याच जीवाचा मत्सर घडू नये,हेच सर्वेश्वराच्या पूजेचं मर्म असल्याचे सांगतात.आपल्या शरीरात जे पंचेंद्रिय आहेत,ते सर्व इंद्रिय एकत्रच काम करतात.त्यातील एका इंद्रियाला जरी सुखदुःख झाले तर सर्व इंद्रियांना समान अनुभूती येते.अशाप्रकारे थेट आकाशाला भिडणा-या शब्दांत तुकारामांनी समानतेची शिकवण दिलेली आहे. ब्रम्हांडापासून ते अगदी छोट्यातील-छोट्या सुक्ष्म जीवाचासुध्दा मत्सर घडू नये इथंपर्यंतच्या उच्च समानतावादी दृष्टीकोनाचे दर्शन आपल्याला येथे घडते."स्वतःच्या वर्तनात , चारित्र्यात त्यांनी सर्व प्रकारच्या खुजेपणावर मात करणारी उच्चता प्राप्त केली होती.जणू काही पृथ्वीपासून आकाशापर्यंत पोचावे,इतके त्यांचे संतत्व,कवित्व आणि व्यक्तित्व उच्च कोटीचे होते. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून समस्त विश्वात मानवी एकतेचा पुरस्कार तर केलाच, शिवाय त्यांनी सामाजीक एकता दर्शवण्यासाठी अगदी साधी-सोपी उदाहरणे देऊन समाजाला ती एकता पटवून दिली. **मुंगी आणि राव । आम्हां सारिखाचि जीव ।।१।। गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ।।२।। सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ।। ३।। तुका म्हणे आलें । घरा वैकुंठ सांवळें ।।४।।** मुंगी आणि राव हे दोघे ही तुकाराम महाराजांच्या दृष्टीने समान असून कळीकाळाचा फास टाकणा-या मोह आणि आशा या दोन वृत्ती नष्ट करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर सोने आणि माती या दोन्ही गोष्टी तुकारामांना सारख्याच वाटतात.ही समानत्वाची वृत्ती आपल्या अंगी अंगीकारल्यामुळे आमचे घर आता स्वर्गासमान झाले असल्याची अनुभुती त्यांना येते.समानत्वाचा हा संदेश तुकारामांनी अत्यंत सोप्या पध्दतीने सांगितला आहे. "**अवघी एकचि वीण । तेथे कैचे भिन्नाभिन्न ।।**" या चरणाप्रमाणे सर्व मानवजात ही एकच असून त्यात कशी भिन्नता असणार ? सद्यपरिस्थितीत संत तुकारामांच्या उपदेशांचे अनुकरण करुन आधुनिक जगात वर्णव्यस्थेची मूळे नष्ट करत समाजात एकसंघतेची फळी निर्माण केली पाहिजे.संत तुकारामांनी जो एकसंघतेचा विचार आपल्याला दिलेला आहे तो लक्षात घेणे येथे महत्त्वपूर्ण ठरते. संत तुकारामांच्या आचारात, विचारात समानतेची,परिवर्तनाची बीजं असल्याचे आपल्याला त्यांच्या अभंगवाणीतून पहावयास मिळते." सकलांसी येथे आहे अधिकार " याप्रमाणे अखंड मानव जातीसाठी 'सकल' हा शब्दप्रयोग करून ते कोणत्याच भेद न मानता ,त्यात विशेष म्हणजे स्त्री-पूरूष हा भेद सुध्दा त्यांनी नाकारला आहे.श्रेष्ठ-कनिष्ठ,उच्च-नीच,गरीब-श्रीमंत,स्त्री-पुरूष या भेदाच्या संकल्पनाच तुकारामांनी मोडीत काढल्या आहेत.हा समानतेचा भाव रूजवण्यासाठी ते अधिक पटवून देताना म्हणतात, **आपणा लागे काम वाण्याघरीं गूळ। त्याचें याति कूळ काय कीजे।।१।। उकरड्यावरी वाढली तुळसी ।टाकावी ते कैसी ठाया गुणें ।।२।। गायीचा जो भक्ष्य अमंगळ खाय। तिचें दूध काय सेवूं नये ।।३।। तुका म्हणे काय सालपटींसी काज । फणसांतील बीज काढुनि घ्यावें ।।४।।** आपल्याला गूळ हवा असेल आणि वाण्याकडे तो मिळत असेल तर त्या वाण्याच्या जातीशी आपल्याला काय घेणे ? हे अधिक पटवून देताना ते सांगतात की, जर तुळस ही जर उकिरड्यावर वाढली तर आपण काय ती टाकून द्यावी का? गाय अमंगळ खात असेल तर तिचे दूध काय पिऊ नये? फणसाचे सालपट कितीही कठीण असले तरी आपल्याला त्याच्या सालपटासी काय घेणे? त्यातील गर काढून घेणे हे महत्त्वाचे असते.त्याच पध्दतीने माणसाचे श्रेष्ठत्व ही त्याच्या वर्ण,जाती,कूळ यावरून न ठरवता त्याच्या गुणांवरून,चारित्र्यावरून,बुध्दीवरुन ठरवावे.त्याचा कोणत्याच कारणांवरून भेदभाव हा करू नये. संत तुकारामांच्या अभंगातील समानत्व गुणांचा आपण आढावा लक्षात घेतला असता आपल्याला हे लक्षात येते की,धर्म म्हणजे,' ज्याला धारण केले जाते तो धर्म होय.जीवन जगण्याची एक आचारपध्दती म्हणजे धर्म ! ' माणसाला माणूस म्हणून समजून घेऊन त्याला माणसांप्रमाणे माणूसकीची वागणूक ही दिली गेली पाहिजे.तसेच प्रस्थापितांनी भेदभावाचे जे स्तोम माजवले होते, तो भेदभाव संत तुकारामांना अमान्य होता.तुकारामांचे आचार-विचार हे उच्चकोटीच्या समानतेचे होते.हे समानतेचे तत्व त्यांनी विश्वातील समस्त मानव जातीला पटवून दिले. **वंदीन मी भूते । आता अवघीच समस्ते।। नर नारी बळे अवघा नारायण। ऐसे माझे मन करी देवा ।।** संत तुकारामांच्या समतावादी दृष्टीकोनाचा आपण आढावा घेतल्यानंतर आपल्याला हा संदेश मिळतो की आपण तुकारामांच्या वाणीचे मोल जाणून घेऊन ते विचारात,आचरणात आणणे गरजेचे आहे. समाजात पसरलेली विषमता नष्ट करुन तुकारामांनी दिलेल्या समतेच्या बीजांचे बिजारोपण करणे, हे आजच्या व्यवस्थेत मैलाचा दगड ठरेल व समतावादी समाज ख-या अर्थाने साकार होईल, यात शंकाच नाही.


कल्पना घुगे-बामणे,
छत्रपती संभाजीनगर

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेंदुर्णी शहरात अवैध धंदे जोमात; अभय कोणाचे ?

## दारू, गुटख्याची खुलेआम विक्री; कठोर कारवाईची गरज : संतोष चौधरी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर व शेंदुर्णी गेल्या काही महिन्यांपासून अवैध धंद्यांना उधाण आल्याचे चित्र दिसून येत आहे. शेंदुर्णी शहरासह गावागावात खुलेआम दारू, गुटख्याची विक्री होत आहे. तालुक्यातील मुख्य रस्त्यांवर असणाऱ्या ढाब्यांतूनही बेकायदेशीरपणे दारूची विक्री होत आहे. मात्र पोलिसांसह सर्वच प्रशासकीय यंत्रणेचे सोयीस्कर दुर्लक्ष झाले असून, दिवसेंदिवस अवैध धंदे फोफावत असल्याचे दिसून येत आहे.माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या गृहमंत्रिपदाच्या काळात अवैध धंद्यांना लगाम बसला होता. त्यामुळे तालुक्यात अपवादानेच बेकायदा धंदे सुरू असल्याचे दिसून येत होते. मात्र तालुक्यात पुन्हा एकदा बेकायदा धंदेवाल्यांनी तोंड वर काढले आहे. शेंदुर्णी व पहूर शहरासह बेकायदा धंदे दिवसेंदिवस



जोमाने सुरु असल्याचे चित्र आहे. शेंदुर्णी शहरातील काही टपऱ्यांवर खुलेआमपणे दारूची विक्री होत आहे. शहराबरोबरच विटा रस्ता, पहूर रस्त्यासह इतर ठिकाणी असलेल्या ढाब्यांवरदेखील खुलेआमपणे बेकायदा दारूची विक्री होत आहे. काही गावात बेकायदा दारूविक्रेत्यांनीही शेंदुर्णी शहरात चांगलेच बस्तान बसवल्याचेही चित्र

> आम्हाला माहिती मिळताच त्या ठिकाणी कारवाई केली जाते. तरी नागरिकांनी आम्हाला सहकार्य करून संबंधित ठिकाणाचे नाव सांगवे आम्ही तात्काळ त्यांच्यावर कारवाई करुन आम्ही गुन्हे दाखल करण्यात येईल.
> **सचिन सानप पोलिस सहायक पोलिस निरीक्षक शेंदुर्णी, पहूर ता. जामनेर**

आहे. बेकायदा दारू विक्रीबरोबरच तालुक्यात गुटखा, पेट्रोलचीही बेकायदेशीरपणे विक्री होत आहे. अनेक गावांत काही पानटपऱ्या, दुकानांतून पेट्रोल, गुटख्याची खुलेआमपणे विक्री केली जात आहे. बेकायदेशीरपणे होणाऱ्या दारू, पेट्रोल आणि गुटख्याच्या विक्रीचे दरही बेकायदेशीर आहेत. दीडपट ते दुप्पट दराने याची खुलेआमपणे विक्री होत आहे. शेंदुर्णीतील मुख्य रस्त्यांवर बेकायदेशीर धंदे खुलेआमपणे सुरु असताना कारवाई झाल्याचे चित्र कोठेचे दिसून येत नाही. संबंधित गावची जबाबदारी असणाऱ्या सपोनि सचिन सानप बेकायदा धंद्यांची माहिती असूनदेखील सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. पोलिस विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यातील अवैद्य धंद्यांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा धंदेवाल्यांवर कोणाचीच जरब नसल्याने चित्र आहे. काही पोलिसांची चिरमिरीची वृत्तीच याला कारणीभूत असल्याची चर्चा असून, काही पोलिस कर्मचारी या अवैध विक्रेत्याकडून वरकमाईत गुंतलेले दिसतात. एखाद्या महिन्याला एखाद्याची शेंदुर्णी वारी चुकली, तर दुसऱ्या महिन्यात दोन हजार रुपये द्यावे लागत असल्याची चर्चा आहे. एकूणच या साऱ्या प्रकारामुळे शहरात अवैध व्यवसाय जोमात असल्याचे दिसत आहे. यामुळे गुन्हेगारीतही वाढ झाली आहे. याला लगाम घातला जावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

ढाब्यावर खाकी : तरीही विक्री शेंदुर्णी शहरात बेकायदा दारू विक्री होणाऱ्या ढाब्यांवर दौऱ्याच्या निमित्ताने काही 'खाकी' वर्दीवाल्यांची वर्दळ असते. त्यावेळी या ठिकाणी खाण्या-पिण्याचा कार्यक्रमही रंगलेला असतो.किंबहुना ढाबेवाल्यांकडूनच खूश केले जात असल्याचे चित्र दिसून येत असून, अशा वागणुकीची नागरिकांत खुलेआम चर्चा सुरु आहे. महिन्याला हजार रुपये गावा-गावात अनेक ठिकाणी बेकायदा दारु विक्री सुरु आहे. या ठिकाणांची आणि सर्वच बेकायदा अड्ड्यांची माहिती खाकीतील काही कारभाऱ्यांना आहे. अशाच एका खाकीवाल्याकडून प्रत्येक महिन्याला न चुकता दारु विक्रेत्यांकडून एक हजार रुपयांचा मलिदा बेकायदा घेतला जातो. पोलिस ठाण्याच्या आवारापासून लांब अंतरावर असे व्यवहार होत असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे अवैध धंद्यांना लगाम घालणार कोण? असा प्रश्न संतोष चौधरी व नागरिकांनी उपस्थित केला जात आहे.

# आ. प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्ताने शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ममुराबाद येथील जिल्हा परिषद शाळेतील आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्ताने शाळेतील मुलांना वह्या पेन पुस्तके साहित्य वाटण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती ज्ञानेश्वर पाटील नलावडे, प्रकाश वाकळे, माजी पंचायत समिती सभापती दिनेश भाऊ अंभोरे, रावसाहेब देशमुख, प्रकाश शिंदे, अंकुश काळे, सुखदेव अंकल वेताळ, गावातील मान्यवर कार्यकर्ते शिक्षक वृंदावन उपस्थित होतेममुराबाद येथील जिल्हा परिषद शाळेतील आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्ताने शाळेतील मुलांना वह्या पेन पुस्तके साहित्य वाटण्यात आली या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे प्रकाश वाकळे दिनेश भाऊ अंभोरे रावसाहेब देशमुख प्रकाश शिंदे अंकुश काळे सुखदेव अंकल वेताळ संतोष




तुकाराम वेताळ सोपान जनार्दन वेताळ रावसाहेब वेताळ गजानन वेताळ सोसायटी सदस्य शिवाजी जेठे सोसायटी चेअरमन राऊत पटेल ग्रामपंचायत माजी ग्रामपंचायत सदस्य पंडित जेठे, भानदास जेठे, सुखदेव साठे, एकनाथ जेठे, नामदेव जेठे, जनार्दन जेठे कारभारी जेठे, भागिनाथ जेठे, रत्नाकर जेठे, दाऊद पटेल, सोपान वेताळ, गजानन तुकाराम वेताळ, भाऊसाहेब वेताळ, पोलीस पाटील आजिनाथ वेताळ, जनार्दन वेताळ, जावेद पटेल, अफसर शेख, सोमीनाथ आदबने, ज्ञानेश्वर वेताळ, गावातील मान्यवर कार्यकर्ते शिक्षक वृंदावन उपस्थित होते.

# पुण्यात पुन्हा हेल्मेटसक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरातील वाहतूक समस्या सोडविण्याबरोबरच महिलांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरणे गरजेचे असून, वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच हेल्मेट वापराबाबत जागृती करण्यात येणार असल्याचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी सांगितले. मावळते पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याकडून अमितेश कुमार यांनी गुरुवारी सायंकाळी पोलीस आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. पुण्यातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. महिला, महाविद्यालयीन तरुणी, शाळकरी मुलींच्या सुरक्षेस प्राधान्य देण्यात येणार आहे. भररस्त्यात कोयते उगारून दहशत माजविणे, अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीत सहभाग, तसेच सराइतांवर वचक ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करून उपाययोजना करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# एस. टी. राष्ट्रीय कर्मचारी संघटनेची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नेमिनाथ जैन**

**बोरी :** 1 जानेवारी 2024 रोजी दर्गा रोड परिसरात झालेल्या बैठकीत एस. टी. राष्ट्रीय कर्मचारी संघटनेची विभागीय कार्यकारणी विभाग नियंत्रक श्री सचिन डफळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. संघटनेच्या परभणी-हिंगोली विभागीय अध्यक्षपदी भास्करराव लंगोटे पाटील तर विभागीय सचिवपदी शाम खेत्री यांची निवड करण्यात आली. विभागीय कार्याध्यक्ष संतोष हरकळ तर विभागीय कोषाध्यक्ष म्हणून बालाजी भुजबळ यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय वाहतूक अधिकारी अमृतराव कछवे, विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी हर्षलकुमार बाविस्कर, आस्थापना पर्यवेक्षक शिवाजी निर्वळ (नाना) व संघटनेचे सर्व विभागाचे विभागीय पदाधिकारी तसेच महाराष्ट्राचे उपाध्यक्ष व प्रादेशिक सहसचिव शेषरावजी ढोणे साहेब यांची उपस्थिती होती. संघटनेच्या सदस्यपदी धोंडीराम जाधव, गंगाधर अंभोरे, राजकुमार घाटूळ, दिगंबर आवटे, सुनील पवार, नितीन धाबे, अरुण कोके, विकास चिंचाणे, बापूराव सुरनर, बापूराव कदम, योगीराज मोरगे, संपत शिराळ, गजेंद्र देशमुख, शामराव जाधव, महिला प्रतिनिधी चंद्रकला बोईनवाड, नंदकुमार राऊत, गरड पाटील यांची निवड करण्यात आली. या निवड बैठकिस सर्व विभागीय पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते. नवीन पदाधिका-यांना यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.



## साहित्य संमेलन...!

साहित्यिक संमेलनात जमतात
शब्दसुमनांचे सोहळे रंगतात,
सारेजण एकमेकाला भेटतात
चांगली-चांगली पुस्तके वाचतात.

परिसंवादाने माहिती मिळते
कथेतून व्यक्तीची व्यथा कळते,
कवितेत शब्द-भावना खेळते
शब्दाशब्दातून यमक जुळते.

साहित्यिकांचे संमेलन भरतात
साऱ्यांच्या हाती पुस्तके दिसतात,
सारेजन देहभान विसरतात
ज्ञानाच्या जगातून फिरून येतात.

निरोप देतांना गाठीभेटी होतात
एकमेकांचे पत्ते- संपर्क घेतात,
आठवणीने पुस्तके भेट देतात
आनंदाने आपापल्या गावी जातात...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण. मो. ९७६४३५०३७४.

# छत्रपती शिवाजी महाराज चौकातील काम पूर्ण करा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील अण्णा भाऊ साठे पुतळा ते येलदरी रस्त्यावरील सिमेंट रोडचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील राहिलेले अर्धवट काम व अतिक्रमण 19 फेब्रुवारी पूर्वी काढण्यात यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे.
याबाबत दि 01 फेब्रुवारी रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की दि. 19 फेब्रुवारी रोजी शहरात तमाम शिवप्रेमीच्या वतीने मोठ्या उत्साहामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येते मागील काही महिन्यापासून साठे पुतळा ते येलदरी रस्त्याचे काम सुरू करण्यात आले असून यासाठी जागोजागी खोदकाम केलेले आहे या खोदकामामुळे जयंती साजरी करण्यास अडचण निर्माण होणार आहे तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असून हे अतिक्रमण 19 फेब्रुवारी पूर्वी काढण्यात यावे अन्यथा आंदोलनाचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर संघटनेचे विभागीय अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब काजळे, तालुकाध्यक्ष अँड माधव दाभाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# उल्हासनगर महापालिकेसमोर लढा कामगार संघटनेचे आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज




**रमेश कांबळे**

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरातील कचरा उचलणाऱ्या कोणार्क ग्रीन इनवायरो ही कंपनी कर्मचाऱ्या विरुध्द मनमानी पणे वागत असुन या कर्मचाऱ्याना नियमा प्रमाणे जे देय लागते ते देत नसुन मागील वर्षभरातील फरकाची रकम अद्याप दिली नाही. तर वेतन स्लिप न देता कर्मचाऱ्याना विना नोटीस कामावरुन कमी करण्यात येते, या अशा विविध मांगण्या साठी लढा कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गायकवाड हे गुरुवार पासुन उल्हासनगर महापालिकेसमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.
उल्हासनगर महापालिकेने शहरातील कचरा उचलन्याचा ठेका कोणार्क इनवायरो या कंपनीला प्रतिदिन ८ लाख रुपये या प्रमाणे दिला आहे. या कंपनीत जवळ पास २७० कर्मचारी काम करत आहेत. मात्र या कर्मचाऱ्याना कोणत्या ही सुविधा कंपनी देत नाही. अनेक वेळा सदर कंपनीला निवेदन देवुन मागणी केली आहे. परंतु कंपनी काही ऐकत नसल्याची प्रतिक्रिया लढा कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप गायकवाड यांनी दिली असुन ते आज पासुन कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या घेवुन महापालिके समोर आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांनी दिलेल्या निवेदनात बारा मागण्या नमुद केल्या आहेत. त्या मध्ये कामगार कायद्या प्रमाणे किमान वेतन, दिलेल्या वेतनाची व किमान वेतन यातील फरकाची रक्कम खात्यावर जमा करा, सर्व कर्मचाऱ्याना कंपनीचे ऑन डयुटी यु एम सी असे ओळखपत्र द्या. वेळेवर वेतन अदा करा, वेतन स्लिप या ई एस आय सी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन द्या, कंपनी मार्फत मोबाईल रिचार्ज व डेटा देण्यात यावा, किमान आठ तास डयुटी देण्यात यावी, ओव्हर टाईम चे पैसे द्या, कर्मचाऱ्याना सन्मानाने वागणुक या कोणत्या ही कर्मचान्याला विना नोटीस कामावरुन कमी करु नये कर्मचान्याना पी एफ व वैद्यकिय सुविधाची माहीती या, वाहनचालक ऑन ड्युडी असताना अपघात झाल्यास व वाहन चालकाची चुकी नसताना त्याच्यावर दंडात्मक कारवाई करु नये या अशा विविध मागण्या निवेदनात नमुद केल्या असुन या मागण्या ताबडतोब मंजुर करण्यात याव्यात म्हणुन लढा कामगार संघटनेने आज पासुन महापालिके समोर आमरण उपोषण सुरु केले आहे.
शहरात कोणार्क कंपनी ही कर्मचाऱ्यांचा छळ करत असल्याचा आरोप संदीप गायकवाड यांनी केला आहे. या बाबत कंपनी व्यवस्थापक यांच्या शी संपर्क साधन्याचा प्रयत्न केला असता संपर्क होवु शकला नाही.

# आरोग्यवर्धिनी केंद्रात सिकल सेल ॲनिमिया तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशिळ आरोग्य वर्धिनी केंद्र येथे सिकल सेल ऍनिमिया शोधमोहिमेच्या अनुषंगाने सिकल सेल तपासणी



मोहीम राबविण्यात येत आहे. सिकल सेल म्हणजेच सिकल पेशी रक्ताक्षय हा आजार गंभीर स्वरूपाचा असल्याने या आजारात सरासरी वयोमान कमी होते व शरीरात तीव्र रक्तक्षय होतो. त्यामुळे वेळत हा आजार शोधुन काढुन त्यावर योग्य ते उपचार करण्यासाठी या आजाराची शोध मोहीम राबविण्यात येत असल्याचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके यांनी सांगितले. या मोहिमेत आत्तापर्यन्त 285 रुग्णांची मोफत तपासणी कनकशीळ आरोग्य वर्धिनी च्या वतीने करण्यात आली आहे.तसेच ज्या प्रमाणात किट प्राप्त होतील तश्या उर्वरित तपासण्या ही केल्या जाणार असल्याचे सांगितले. या वेळी सरपंच संदीप निकम यांनी उपकेंद्राद्वारे राबवीत असलेल्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आणि अधिकाधिक नागरिकांनि ही तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. या उपक्रमासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ किरण शिंदे व वैद्यकीय अधिकारी डॉ. निलोफर अंज्जूम यांच्या मार्गदर्शनाखाली समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रमेश शेळके, आरोग्य सहायक विजय जाधव, आरोग्य सेवक अनिल बनकर,आरोग्य सेविका ज्योती चिमणे व आशा हिरा दांडगे यांनी सहकार्य केले.

# घोडेगावात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथे दि.31 /01/2024 रोजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय,सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, व स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय घोडेगाव ता. खुलताबाद येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब, मुख्य अतिथी म्हणून डॉ.श्री. शाहु पाटोळे सर (निवृत्त क्षेत्रीय प्रसारण अधिकारी,) लेखक, साहीत्य पत्रकार, दूरदर्शन मुंबई) पदावरून निवृत्त. श्री. जीवन कुलकर्णी (प्रकाशक) नीरा प्रकाशन, श्री. प्रशांतसिंग राजपुत ( लेखा परीक्षक, लेखा परीक्षण विभाग, महाराष्ट्र शासन छत्रपती संभाजीनगर) विजय पाटील जाधव उपस्थित होते. यानंतर व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आलेल्या सर्व मुख्य अतिथींचे सन्माननीय साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मा.साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले. तद्नंतर श्री. प्रशांतसिंग राजपुत यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषा संवर्धन यावर मार्गदर्शन केले.शेवटी आजचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित श्री. शाहु पाटोळे साहेब यांचे भाषण झाले.त्यांनी त्यांच्या सुंदर शैलीत मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत . विद्यार्थ्यांनी अवांतर मराठी साहित्याचे वाचन करावे. त्यांना आयुष्यात आलेले अनुभव सांगितले.विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांचे शंकानिरसन केले. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पाटोळे सर यांनी स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयास त्यांनी लिहीलेली सर्व पुस्तके वाचनालयास भेट दिली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. सूत्रसंचालन प्राध्यापिका ठाकूर मॅडम व आभार प्रदर्शन श्री. संदीप जाधव सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यास प्रशासकीय अधिकारी,प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मोकभनगी विद्यालयाचे चित्रकला स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** म.वि. प्र.संचलित महात्मा फुले हायस्कूल मोकभनगी विद्यालयातील शासकीय चित्रकला स्पर्धेसाठी बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन विद्यालयाचा १००%निकाल लागला आहे.कुमारी-श्रुती शेवाले हिस बी प्लस ग्रेड मिळाला तर उर्वरित विद्यार्थ्यांना सी हा ग्रेड मिळाला. तसेच म.वि. प्र चित्रकला स्पर्धेसाठी विद्यालयतील ६७ विद्यार्थी बसले होते.या परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १००%निकाल लागला आहे.विद्यालयाची विद्यार्थिनी कु.गायत्री सुरेश पवार ही ए प्लस ग्रेड ने उत्तीर्ण झाली.तर उर्वरित विद्यार्थी बी प्लस या ग्रेड ने उत्तीर्ण झाले.यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या कला शिक्षिका श्रीमती.पाटिल के.बी यांचे अभिनंदन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती.अहिरे व्ही. आर यानी केले.या कार्यक्रमासाठी विद्यालयतील सर्व शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



# मानोरी खुर्द खरेदी-विक्री केंद्रावर द्राक्षेमणी लिलावास सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मानोरी खुर्द व परीसरातील द्राक्षे उत्पादक शेतकरी बांधवांच्या सोईसाठी ह्या



वर्षापासुन लासलगांव बाजार समितीच्या मानोरी खुर्द येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रांवर आज शनिवार दि.३ पासुन द्राक्षेमणी लिलाव सुरू होणार असल्याची माहिती लासलगांव बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर यांनी दिली.
निफाड तालुक्याच्या पुर्व भागातील गावांसह येवला, सिन्नर, कोपरगांव ह्या तालुक्यातील गावांमध्ये शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर द्राक्षांची लागवड केलेली असल्याने त्यांची मालविक्रीची सोय जवळच निर्माण व्हावी म्हणुन लासलगांव बाजार समितीतर्फे दरवर्षी उगांव, खानगावनजिक व नैताळे येथे द्राक्षेमणी शेतीमालाचे खरेदी-विक्री केंद्र सुरू केले जाते. सदर केंद्रांस परीसरातील शेतकरी व व्यापारी बांधवांकडुन दरवर्षी चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ह्या वर्षापासुन मानोरी खुर्द खरेदी-विक्री केंद्रावर आज शनिवारपासुन द्राक्षेमणी या शेतीमालाचे लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मानोरी खुर्द येथील खरेदी-विक्री केंद्रावर शनिवार दि.३ फेब्रुवारी पासुन दररोज दुपारी ४ वा. आपला द्राक्षेमणी हा शेतीमाल योग्य प्रतवारी करून विक्रीसाठी आणावा. वजनमापानंतर लगेच रोख पेमेंट देण्याची व्यवस्था बाजार समितीने केलेली असुन द्राक्षेमणी खरेदी करण्यासाठी जास्त व्यापारी इच्छुक असल्याने स्पर्धात्मक बाजारभावामुळे शेतक-यांना योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे. शेतीमाल बाजार समितीच्या खरेदी-विक्री केंद्रांवरच विक्री करावा, असे आवाहन सभापती बाळासाहेब क्षिरसागर व उपसभापती गणेश डोमाडे यांनी केले असुन बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात विनापरवाना शिवार खरेदी करणाऱ्या द्राक्षेमणी खरेदीदारांवर कायद्यातील तरतुदीप्रमाणे कठोर कारवाई करण्याचे आदेश बाजार समिती प्रशासनाला देण्यात आलेले आहे.

# ज्ञान कुंज महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय येथे बारावीतील शैक्षणिक सत्र 2023-24 मधील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थाचालक महामंडळ व विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव वाल्मीकजी सुरासे सर तसेच करिअर मार्गदर्शक तज्ञ चंद्रकांत उन्हाळे सर तसेच आदर्श शिक्षक व नुकतेच उपशिक्षणाधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण झालेले जिल्हा परिषद प्रशाला बाजारसावंगीचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त चत्तरसिंग परदेशी सर व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री शेळके सर तसेच ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयजी द्वारकुंडे सर हे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात ही मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली .याप्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयातील काही आठवणींना उजाळा देत आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर शैक्षणिक सत्र 2023-24 मधील उत्कृष्ट विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊ अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयातील राज्यस्तरी क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील यावेळेस मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या शुभेच्छा कार्यक्रम प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील वाटचालीसाठी तसेच येणाऱ्या बारावीच्या बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष विजय द्वारकुंडे यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व शैक्षणिक साहित्याची पूर्तता ही कशापद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पुरवल्या जाते याची थोडक्यात माहिती दिली. त्याचबरोबर यापुढील काळामध्ये देखील महाविद्यालय सर्व विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने सर्व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्ता टिकवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी पूर्ण केल्या जातील याची शाश्वती या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी वैष्णवी माचवे व कुमारी प्रांजल पवार या विद्यार्थिनींनी केले तर प्रस्तावना प्रा गाडेकर सर यांनी केली तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय श्रीमती जाधव मॅडम यांनी केला तर आभार सुरडकर सर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री योगेश झिंजूर्के, प्रा मनोज राणे ,प्रा योगिता पारनेरे, प्रा नितीन पवार ,प्रा राम राठोड ,प्रा वृषाली कुलकर्णी ,प्रा कृष्णा चव्हाण ,प्रा अविनाश गाडेकर, प्रा योगेश सुरडकर, प्रा सुरेखा जाधव, प्रा दीपक पाटील, प्रा राहुल गायकवाड ,भूषण जाधव, अविनाश कोलते ,अक्षय जाधव, धुमाळ बाबा ,वाहाटूळे मावशी यांची उपस्थिती होती.



# महावितरण अधिकाऱ्यांमध्ये रंगला प्रदर्शनीय क्रिकेट सामना

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेदरम्यान गुरुवारी महावितरणचे सांघिक कार्यालय तसेच छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यक्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संघात प्रदर्शनीय क्रिकेट सामना रंगला. यात सांघिक कार्यालयाने विजय मिळवला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर झालेल्या या मैत्रीपूर्ण सामन्यात सांघिक कार्यालयाचे नेतृत्व संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी तर छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक संघाचे नेतृत्व मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांनी केले. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत छत्रपती संभाजीनगरने निर्धारित 12 षटकांत 6 बाद 92 धावा केल्या. यात कार्यकारी अभियंता अविनाश राऊत यांनी 20, महेश पाटील यांनी 10, अधीक्षक अभियंता संजय सरग यांनी 6, जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी 5, प्रणाली विश्लेषक तौसिफ पटेल यांनी 7 धावांचे योगदान दिले. मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे, अधीक्षक अभियंता मोहन काळोगे, शांतीलाल चौधरी, नरेंद्र नारायणे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) लक्ष्मीकांत राजेल्ली, उपसंचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) सतीश कापडणी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, महेंद्र चुनारकर यांनीही फलंदाजी करून धावसंख्या वाढवण्यास हातभार लावला. सांघिक कार्यालयाने 10 षटकांत विजयी लक्ष्य गाठले. यात महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजेंद्र पांडे यांनी 33, मुख्य अभियंता भुजंग खंदारे यांनी 14, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी 13 धावा केल्या. संचालक (मानव संसाधन) अरविंद भादीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, अधीक्षक अभियंता मिलिंद दिग्रसकर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोळे, उपविधी अधिकारी सुमेध कोलते, विजय हन्नावार, वरिष्ठ व्यवस्थापक बजरंग सूर्यवंशी, प्रणाली विश्लेषक कैलास देशमुख, अनुदेशक हसीब खान यांनीही विजयात महत्त्वाचा वाटा उचलला. मुख्य अभियंता सुनील काकडे, राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक तुषार भोसले यांनी पंचांची भूमिका पार पाडली. तर प्रादेशिक संचालक सुहास रंगारी व मुख्य अभियंता परेश भागवत यांनी समालोचन केले.

# उर्दू माध्यमातील मुलींना फुल फ्रॉक व फुल सलवार द्यावी : आ.फारुख शाह

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना एकसमान एक रंगाचचे दोन गणवेश देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना हाफ पॅन्ट आणि हाफ शर्ट व ८ वी साठी फुल पँट,हाफ शर्ट आणि इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थिनींना पिनो फ्रॉक इयत्ता ५वी ते ७ वी च्या विद्यार्थिनींना शर्ट व स्कर्ट व ८ वी च्या विद्यार्थिनींना सलवार - कमीज - ओढणी देण्यात येणार आहे.मात्र एकूणच इ.१ ली ते ८वी वर्गातील उर्दू माध्यमाच्या विद्यार्थिनींना या योजने अंतर्गत फुल फ्रॉक व फुल सलवार द्यावी आणि विद्यार्थ्यांना फुल शर्ट आणि फुल पँट देण्यात यावी अशी मागणी आ.फारुख शाह यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना. दीपक केसरकर यांचेकडे मंत्रालयात प्रत्यक्ष भेटून केली.

शासनाच्यावतीने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देणे बाबत दि.१८ऑक्टोबर २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.तसेच दि.२४/०१/२०२४ रोजी शुद्धिपत्रकानुसार १ ली ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना हाफ पॅन्ट आणि हाफ शर्ट व ८ वी साठी फुल पँट,हाफ शर्ट आणि इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थिनींना पिनो फ्रॉक इयत्ता ५वी ते ७ वी च्या विद्यार्थिनींना शर्ट व स्कर्ट व ८ वी च्या विद्यार्थिनींना सलवार - कमीज - ओढणी देण्यात येणार आहे. मात्र सदर गणवेश गैरसोयीचा असल्याने इ.१ ली ते ८वी वर्गातील उर्दू माध्यमाच्या विद्यार्थिनींना या योजने अंतर्गत फुल फ्रॉक व फुल सलवार द्यावी आणि विद्यार्थ्यांना फुल शर्ट आणि फुल पँट देण्यात यावी.अशी मागणी आ.फारुख शाह यांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना.दीपक केसरकर यांच्याकडे केली. ना.केसरकर यांनी आ.फारुख शाह यांच्या मागणी मान्य करीत शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना उचित कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले.

# जाणता राजा महानाट्याचे प्रयोग दोन दिवस वाढवून विना पासेस करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित “जाणता राजा” महानाट्य चे प्रयोग पाहण्यासाठी प्रशासनाच्या वतीने पासेसची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र हे पास काही ठरावीक प्रेक्षकांपर्यंच पोहचले आहे. त्यामुळे या नाट्याच्या माध्यमातून महाराजांचा शुर इतिहास पाहण्याची ईच्छा असलेल्या सर्व सामान्य नागरिकांना नाट्य प्रयोगापासून वंचित राहावे लागत आहे ही बाब लक्षात घेता सदर नाट्य प्रयोग दोन दिवस वाढविण्यात यावा, विना पास नागरिकांना प्रवेश देण्यात यावा आणि प्रेक्षक संख्या 25 हजार करण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या एका शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी विनय गौडा यांची भेट घेतली असून सदर मागणीचे निवेदन दिले आहे. या शिष्टमंडळात वंदना हातगावकर, जितेश कुळमेथे, आशा देशमूख, आशु फुलझेले, जय मिश्रा आदींची उपस्थिती होती. चंद्रपूर जिल्ह्यात सांस्कृतिक कार्य विभाग, महासंस्कृती व चंद्रपूर जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित महानाट्य “जाणता राजा” महानाट्य चे प्रयोग दिनांक ०२ ते ०४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान चांदा क्लब ग्राउंड येथे आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवरायांवर आधारित सदर महानाट्याचे प्रयोग दर्शकांना बघण्यासाठी प्रशासनातर्फे पासेस वाटप केले आहे. सदर पास शिवाय नागरिकांना हा नाट्य प्रयोग पाहता येणार नाही. मात्र सदर महानाट्य प्रयोग पाहण्यासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांना पास उपलब्ध झाले नाही. सदर पास कुठून मिळवायचे याबाबत नागरिकांना अद्यापही माहिती नाही. तर अनेक ठिकाणी पासेस संपले व उपलब्ध नाही असे सांगण्यात येत आहे. अशा अनेक तक्रारी प्राप्त होत आहे. त्यामुळे शिव छत्रपती महाराजांचा शूरवीर इतिहास प्रत्येक घरी पोहचावा या उद्देशातून शासनाच्या वतीने आयोजित “जाणता राजा” या महानाट्य प्रयोगाचा मूळ उद्देश यशस्वी होणार का याबाबत शंका उपस्थित होत आहे. ही बाब लक्षात घेता आणि चंद्रपूरकरांच्या भावनांचा आदर करत सदर नाट्यप्रयोग आणखी दोन दिवस वाढविण्यात यावा. नाट्य प्रयोगाची प्रेक्षक संख्या २५ हजार करण्यात यावी व पासेस व्यवस्था बंद करून हे महानाट्य सर्वसामान्य नागरिकांना बघण्यासाठी मोकळे करण्यात यावे. यावेळी अव्यवस्था होऊ नये यासाठी उत्तम नियोजन शासनाच्या वतीने करण्यात यावे अशी मागणी सदर निवेदनाच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

# स्वतःच्या व्यवसायातून उज्वल भविष्याकडे वळा : श्याम हेडाऊ

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** देशात कोणतेही सरकार येऊ दे , ते प्रत्येकाच्या हाताला नोकरी देऊ शकत नाही . त्यामुळे तरुणांनी कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून किंवा मिळेल तिथून वेगवेगळे प्रशिक्षण घेऊन स्वतःमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण केल्यास स्वतःच्या व्यवसायातून उज्वल भविष्य निर्माण करता येऊ शकते . त्यामुळे तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या व्यवसाय निर्मितीकडे वळण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन प्राध्यापक शाम हेडाऊ यांनी केले.
मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजीनियरिंग सर्विसेस लिमिटेड पुणे द्वारा आयोजित आणि उद्योग संचालनालय , महाराष्ट्र शासन , मुंबई द्वारा प्रायोजित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुदायिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी आयोजित निवासी उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. स्थानिक विकास केंद्र येथे आयोजित या कार्यक्रमांमध्ये मिटकॉन कन्सल्टन्सी चे चंद्रपूर जिल्हा समन्वयक संतोष लंके, कार्यक्रम समन्वयक लक्ष्मी खोब्रागडे, गुणवंत वाटेकर आदींची उपस्थिती होती.
व्यवसायातील मनुष्यबळ व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन आणि कच्च्या मालाचे व्यवस्थापन या विषयावर बोलत असताना श्याम हेडाऊ यांनी व्यवसायातून निर्माण झालेला पैसा हा अनुत्पादक बाबींवर खर्च न करता तो पुन्हा व्यवसायातच गुंतविल्यास निश्चित यश मिळत असते. तसेच मनुष्यबळ व्यवस्थापनासाठी डोक्यावर बर्फ, तोंडात साखर व पायाला भिंगरी असावी लागते आणि कच्च्या मालाच्या नियोजनासाठी सुद्धा संबंधित क्षेत्रातील विविध घटकांसोबत आपले संबंध आपण कसे निर्माण करतो यावर व्यवसायाचे यश अपयश अवलंबून असते असे प्रतिपादन केले .

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून कार्यक्रम समन्वयक लक्ष्मी खोबराकडे यांनी या 18 दिवसीय कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. तर गुणवंत वाटेकर यांनी प्रमुख वक्ते शाम हेडाऊ यांचा परिचय करून देत त्यांच्या मार्गदर्शनातून तरुणांनी व्यवसायिक दिशा जोपासावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मी कोब्रागडे तर , आभार प्रदर्शन गुणवंत वाटेकर यांनी केले . यावेळी आपले मनोगत व्यक्त करत असताना विद्यार्थ्यांनी शाम हेडाऊ यांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे एक नवा दृष्टिकोन मिळाला असून आपणही उद्योजक होऊ शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे मनोगत व्यक्त केले .

# विरोधी पक्षातील नेत्यांची होणारी हेळसांड थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** केंद्र सरकार कडून विरोधी पक्षातील नेत्यांची हेळसांड थांबविणे बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तालुका अध्यक्ष इंद्रसिंह सोळंके व पदाधिकारी अधिकारी यांनी तहशिल कार्यालयात लेखी निवेदनाद्वारे केली आहे. केंद्र व राज्य सरकार विरोधी पक्षातील नेत्यांची काही कारण नसताना इडी व सिबीआय यांच्या मार्फत चौकशी करतात तरी या चौकशीला आळा बसून नि पक्षापाती करण्यात याव्यात व या प्रमुख चौकशी समितीच्या गैर वापर करणे चुकीचे आहे ते थांबवावे असे लेखी निवेदन सोयगाव तहशिलचे तहशिलदार मोहनलाल हरणे यांच्या कडे व जिल्हाअधिकारी, उपविभागिय अधिकारी सिल्लोड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी यांनी केली आहे. याप्रसंगी निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे डॉ. इंद्रसिंह सोळंके तालुका अध्यक्ष, रविंद्र काळे, दिपक देशमुख,करीम देशमुख, कृष्णा पाटील, अजय नरेपगाट,दत्तू निकम, रोहिदास जाधव, शेषमल गोंडू व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गासाठी २२५ कोटींची तरतूद!

## रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाच्या पहिल्या टप्प्यात धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी अंतरिम अर्थसंकल्पात २२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यावर राज्याचा ५०% हिस्स्याचे ४५२ कोटी रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे रेल्वेने ५४४ कोटी रूपयांच्या कामाची निविदा प्रकाशित केली आहे.आता अंतरिम अर्थसंकल्पात यासाठी केलेल्या तरतुदीमुळे या प्रकल्पाला अधिक गती मिळेल. २०१९ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धाराशिव जिल्ह्यातील जनतेला दिलेला शब्द खरा करून दाखवला आहे. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या एकूण ८४.४४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील कामाचे दोन स्वतंत्र टप्पे केले आहेत. या रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल असणार आहेत. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. धाराशिव तालुक्यातील नऊ आणि तुळजापूर तालुक्यातील १५ गावांमधील ४९४.२६ हेक्टर



जमिनीचे भूसंपादन सध्या अंतिम टप्प्यात आहे. रेल्वेमार्ग निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी कामाचे टप्पे पाडण्यात आले आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील कामाची निविदा जाहीर करण्यात आली आहे. तिसऱ्या टप्प्यात बोगद्याच्या कामांना हाती घेण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर या रेल्वेमार्गासाठी ४५२.४६ कोटी रूपयांच्या निधीला तत्काळ मंजुरी देण्यात आली. आता अंतरिम अर्थसंकल्पात याला २२५ कोटींची तरतूद केल्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा रेल्वेमार्ग पूर्णत्वाच्या टप्प्यावर आला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत राज्य सरकारच्या हिश्श्यातील ५० टक्के निधी रखडला होता. त्यामुळे तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राला जोडणाऱ्या रेल्वेमागार्च्या कामाला उशीर झाला. ठाकरे सरकारच्या कालावधीत निधी उपलब्ध करून दिला असता तर तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राला रेल्वेच्या नकाशावर येण्यासाठी एवढा विलंब लागला नसता, अशी प्रतिक्रियाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली.

धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आहेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे. सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे. या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे. या मुख्य रेल्वेस्थानकाच्या पुनर्विकासासाठी नुकतेच नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २१ कोटी रूपयांचा निधी सुपूर्द केला आहे.

# शिवतीर्थाचा शिवजन्मोत्सव, शिवजयंती 2024 उत्सव समिती कार्यकारणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**जळकी बाजार :** अवघ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सिल्लोड तालुक्यातल भारतातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे तिसरे मंदिर असलेल्या शिवतीर्थ जळकीबाजार येथील शिवजयंती उत्सव समिती कार्यकारणी जाहीर झाली आहे.. दर वर्षी अनेक समाजउपयोगी उपक्रम राबवित आदर्श पद्धतीने शिव जन्मोत्सव साजरा होत असतो.

जिल्हा भारत आदर्श शिवजयंती साजरी करण्याचा संदेश घेवून अनेक नवनवीन उपक्रम राबवून साजरे करीत असतात...श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शिवतीर्थ जळकी बाजार येथे मंदिर समितीची वार्षिक सभा स्मपंन झाली.या सभेत सर्वांच्या सहमतीने शिवजयंती 2024



उत्सव समिती कार्यकारणी करण्यात आली. या मधे अध्यक्षपदी श्री निवृत्ती दांडगे,उपाध्यक्षपदी श्री ऋषिकेश दांडगे, सचिवपदी श्री किरण जाधवसह सचिवपदी हनुमंता दांडगे,विशेष सल्लागारपदी श्री रोहिदास दांडगे, तर कोषाअध्यक्षपदी रवींद्र सोनवणे,यांची निवड करण्यात आली असून, या ही वर्षी मोठ्या उत्साहात शिव जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या वेळी श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर समितीचे सर्व पदाधिकारी,सभासद, यांच्या सह शेकडो ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# शिवजयंती अध्यक्षपदी गणेश वाघमोडे तर स्वागतध्यक्षपदी विजय सूते

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** छत्रपती श्री शिवाजी महाराज जन्मोत्सव समिती २०२४ साठी दि. १ फेब्रुवारी गुरुवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात जन्मोत्सव समितीचे माजी अध्यक्ष शिवराज रामभाऊ पारिख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली यावेळी २०२४ चे अध्यक्ष गणेश बाबासाहेब वाघमोडे, उपाध्यक्ष नवनाथ पाटील गोरे, कार्याध्यक्षपदी साईनाथ पाटील कर्डिले, स्वागत अध्यक्षपदी विजय सुते, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी समितीचे जेष्ठ सदस्य तथा पदाधिकारी श्री दत्तात्रय चेन्ने,हरिभाऊ शेळके,श्री दशरथ पाटील खरात, शहादेव काका लोहारे,नामदेव खरात, गणेश पवार, राजूभाऊ गायकवाड, राजुभाऊ टेकाले,किशोर पाटील सदावर्ते, आतिश भाऊ गायकवाड,दादासाहेब पठाडे साहेब, तसेच उत्सव समितीचे इतर सदस्य यावेळी भूषण काका कावसणकर, तुषार पाटील, जालिंदरभाई आडसुल, स्वप्निल भाऊ साळवे, किशोर





भाऊ चौधरी, शेखर पाटील शिंदे, जनार्दन मिटकर, पवन खरात सर, राज मानधने, मनीष औटे, दिनेश खंडागळे, अमोल तुपे, आकाश जाधव, विष्णू जगताप, ललित कायस्त, योगराज पवार, रोहित हिंगे, ओंकार साळुंखे, दिनेश खंडागळे, महेश गाडे, किरण भुकेले, अशोक पठाडे, बाळासाहेब पठाडे, विजय रमेश खंडागळे, अजय पैलवान, विशाल घुंगासे विकास राठोड, संदीप क्षीरसागर, श्रीकांत कांबळे, ऋषिकेश दहिभाते,श्याम शिंदे, सुरज विश्वकर्मा, प्रणित निकालजे, राम भुकेले, मनोज ससाणे, सुरज गोजरे, शुभम पहिलवान, दिपक आडसुल, सुरज हिवराले, प्रकाश राठोड, सुमित गायकवाड, व सर्व शिवभक्ताची उपस्थिती होती.




# युवक काँग्रेसच्या बैलगाडी मोर्चास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** केंद्र व राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळत नाही.त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.शेतक-याच्या मालाला योग्य भाव मिळावा या मागणीसाठी गुरुवारी (ता.एक) तालुका युवक काँग्रेसच्या वतीने बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करित असून कापूस व सोयाबीनला कवडीमोल भाव आहे. कापूस खरेदी केंद्र अद्याप सुरू झाले नाहीत.त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.यास केंद्र शासन व राज्य सरकार जबाबदार आहेत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव द्यावा अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अत्रिक पाटील मुंगल, सभापती जगदीश पाटील भोसीकर, उपसभापती बालाजी शानमवाड, संचालक रामचंद्र मुसळे, केशव पाटील पोमनाळकर, व्यंकट पाटील, राघोबा पाटील, सुरेश पाटील डुरे, कैलास पाटील, नागोराव दंडे, सतीश पाटील, विक्रम क्षीरसागर, श्रीधर पाटील, शिवाजी पाटील, माधवराव पाटील, आनंद ढोले, गिरीश पाटील, श्रीकांत दरबस्तवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# श्रीमती अलका लांबा यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात यावी


## गौरीशंकर मुळे प्रदेश उपाध्यक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** अखिल भारतीय महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष श्रीमती अलका लांबा यांना महाराष्ट्रातून राज्यसभेची उमेदवारी देण्यात यावी. अशी मागणी किसान काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष गौरीशंकर मुळे व काँग्रेसच्या विविध सेलच्या पदाधिकाऱ्यांनी केली असल्याची माहिती मुळे यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

अखिल भारतीय महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नुकत्याच रुजू झालेल्या श्रीमती अलका लांबा यांनी काँग्रेस पक्षासाठी खुप मोठे योगदान दिले आहे. यापूर्वी एनएसआयच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अलका लांबा यांनी समर्थपणे जबाबदारी पार पाडली आहे. तसेच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सदस्य म्हणून त्यांनी अनेक वर्ष पदभार सांभाळला आहे. प्रख्यात राजकीय तज्ञ आणि सुस्पष्ट वक्तृत्वाच्या धनी असलेल्या श्रीमती लांबा यांनी काँग्रेस पक्षासाठी प्रवक्त्या म्हणून काम पाहिले आहे. काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्या म्हणून बोलत असतांना त्यांनी कित्येकवेळा विरोधकांची बोलती बंद केली आहे. त्यामुळे पक्षाच्या एक प्रबळ नेत्या म्हणून त्या





संपूर्ण देशात सुपरिचित आहेत. एक कणखर व्यक्तिमत्त्व आणि तळागाळातील लोकांच्या समस्यांचा सखोल अभ्यास असल्यामूळे त्यांना महाराष्ट्रातून राज्यसभेची उमेदवारी दिल्यास राज्यासाठी ही सन्मानाची बाब ठरेल. आणि वरिष्ठ स्तरावरील त्यांच्या राजकीय अनुभवाचा निश्चितच फायदा होईल. त्या अनुषंगाने त्यांना महाराष्ट्रातून राज्यसभेची उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी केली असल्याचे त्यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे. अशाच स्वरूपाची मागणी सोलापूर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री विजयकुमार हतुरे, कोल्हापूर किसान काँग्रेसचे अध्यक्ष रंजीत माने पाटील, काँग्रेस कमिटीच्या क्रिडा विभागाचे उपाध्यक्ष शिरीष खताळ,बालाजी नाईकल, किसान काँग्रेसचे सरचिटणीस श्री अनिल पाटील, माधव पाटील आदींनी केली असल्याचे गौरीशंकर मुळे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

# धानोरा येथील पहिल्या बौद्ध धम्म परिषदेस उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली वसमत तालुक्यातील धानोरा भोगाव येथे भरलेल्या पहिल्या बौद्ध धम्म परिषदेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बौद्ध उपासक उपासिका यांच्या अथक परिश्रमातून या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने प्रशिक्षण केंद्राच्या धम्मदान व धम्मसंदेश यात्रेस पाचारण करण्यात आले होते. यावेळी भदंत डॉ. खेमधम्मो, भदंत महाविरो, भदंत पंय्यानंद थेरो, भदंत धम्मशील थेरो यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष यशवंतराव उबारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. बौद्ध उपासक उपासिका यांच्याकडून भिक्खू संघास भोजनदान देण्यात आले. त्यानंतर गावातील मुख्य रस्त्यावरुन तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भिख्खू संघासह बौद्ध उपासक, उपासिका, बालक, बालिका, युवक, युवती यांच्या मोठ्या प्रमाणावरील सहभागाने शांततापूर्वक मिरवणूक काढण्यात आली. दुपारच्या सत्रात भदंत डॉ. खेमधम्मो, भदंत महाविरो, भदंत पंय्यानंद थेरो, भदंत धम्मशील थेरो, भदंत पंय्याबोधी थेरो यांनी जनतेला धम्मदेसनेच्या माध्यमातून धम्मदान व धम्मसंदेश दिला. त्यानंतर उपस्थित सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांना भोजनदान देण्यात आले.रात्री तिसऱ्या सत्रात सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज यांचा प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न झाला. दरम्यान संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे राज्याध्यक्ष तथा कार्यकारी संचालक भीमराव हत्तीअंबिरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच मधुकर मांजरमकर, रणधीर तेलगोटे, मुगाजी खंदारे, गौतम मोगले, जी. डी. मुळे यांचाही नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमाला प्रा. रमेश मानवते, प्रा. खंदारे, राजकुमार एंगडे, प्रा. साहेबराव इंगोले, चंद्रमणी मस्के, डॉ. खुंटे यांचीही विशेष उपस्थिती लाभली होती. तसेच अनिल कांबळे, किरण धोंगडे, विजयकुमार एंगडे, महेंद्र गायकवाड, मुकुंद करवंदे, आनंद खरे, आकाश दातार, आनंद करवंदे, उत्तम करवंदे, एल आर. कांबळे, मुरलीधर गव्हाणे, प्रमोद कुलदिपके, रघुनाथ लांडगे आदींची उपस्थिती होती. धम्म परिषदेच्या यशस्वीतेसाठी धानोरा येथील बौद्ध उपासक उपासिका युवक युवती यांनी परिश्रम घेतले. परिषदेस गावासह आजुबाजूच्या परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# 'ते' गाणं वाजलं तर डीजे पेटवू : आमदारांसमोर ओबीसी आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** फलटण तालुक्यात तसेच महाराष्ट्रात मराठा आंदोलक व मराठा क्रांती मोर्च्या यांच्या वतीने विविध आंदोलनात तसेच मराठा आंदोलन सभांमधून ओबीसींचे जेष्ठ नेते व मंत्री छगनराव भुजबळ यांच्या नावाचा वापर करून वाजवले जाणारे गाणे ओबीसींच्या भावना दुखवणारे असून यामुळे सामाजिक तेढ वाढत आहे.या गाण्याचा वापर सार्वजनिक ठिकाणी केला जात असून यामुळे ओबीसी समाज तीव्र नाराज आहे या पुढे हे गाणे वाजवल्यास तो डी जे पेटवून देऊ व होणाऱ्या उद्रेकास सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल अशा आक्रमक भावना ओबीसी तरुणांनी आमदार दिपकराव चव्हाण यांच्या समोर मांडल्या.या वेळी आमदार दीपक चव्हाण यांनी दोन्ही बाजूने शांतता व सौहार्द राखावा.फलटण हे नेहमीच एकमेकांचा आदर करणारे शहर आहे.त्यामुळे अशा प्रकारचे गाणे अथवा इतर गोष्टी ज्या मुळे शांतता भंग होईल. अशा गोष्टी कोणीही करू नयेत.असे आवाहन केले. ओबीसी संघर्ष समितीने दिलेल्या निवेदनात म्हणले आहे की या पुढे या गाण्याला फलटण तालुका तसेच संपूर्ण महाराष्ट्रात कायमची बंदी घालावी. त्याच बरोबर हे गाणे वाजवणाऱ्या डी जे वर कडक कारवाई करावी.जर हे गाणे या पुढे कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वाजले तर ओबीसी बांधवांच्या उद्रेकास प्रशासन जबाबदार राहील तरी त्वरित या गाण्यास बंदी घालण्यात यावी.असे सुद्धा म्हटलं आहे. २६ जानेवारी रोजी मराठा आरक्षणासंदर्भात राज्य शासनाकडून सगेसोयरे संदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली होती.या अधिसुचनेला विरोध करत फलटण तालुका संघर्ष समिती ने पुकारलेल्या मोर्चाला ओबीसींनी प्रचंड साथ देत घोषणांनी फलटण शहर दणाणून सोडले.नाना पाटील चौक येथे मराठा आरक्षण आधिसूचनेची होळी आंदोलकांकडून करण्यात आली व तीव्र शब्दात सरकारला इशारा देण्यात आला.



ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांच्या विरोधात बेताल वक्तव्य करणाऱ्या आमदार संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून आंदोलकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या फलटणचे प्रांताधिकारी सचिन ढोले यांना फलटण प्रांतकार्यालयात तसेच , आमदार दिपक चव्हाण तसेच खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या निवासस्थानी जाऊन ओबीसीं मधून मराठा आरक्षण देण्यास तीव्र विरोध केला. सकाळी दहा वाजता संत सावतामाळी मंदिर नाना पाटील चौक येथून निघालेला मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ,महात्मा फुले चौक मार्गे प्रांतकार्यालयात पोहचला यावेळी फलटण तालुक्यातून तमाम ओबीसी बांधव सामील झाले होते ओबीसींच्या घोषणांनी फलटण शहर दणाणून सोडले.प्रांतकार्यालय फलटण येथे प्रांताधिकारी सचिन ढोले यांनी निवेदन स्विकारले विधानपरिषदेचे माजी सभापती आ श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्या निवासस्थानी आमदार दीपक चव्हाण यांनी निवेदन स्विकारले ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजास आरक्षण देण्यात येईल अशीच सरकारची पहिल्या पासून भावना आहे ओबीसींच्या भावनाचा आदर नक्की केला जाईल असे त्यांनी सांगितले खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या वतीने युवा नेते अभिजित नाईक निंबाळकर यांनी निवेदन स्विकारले या वेळी फलटण तालुक्यातील हजारो ओबीसी बांधव उपस्थित होते. आधिसूचनेची होळी ओबीसी आंदोलकांकडून नाना पाटील चौक येथे मराठा आरक्षण आधिसूचनेची होळी करण्यात आली 'सगेसोयरे 'या व्याख्येला विरोध करत संतप्त जमावकडून शासन व शिंदे सरकार विरोधात प्रचंड घोषणा देण्यात आल्या.



# घोड्यावर मिरवणूक काढत ग्रामस्थांनी केले रविकांत तुपकरांचे जंगी स्वागत

## सातळी येथील एल्गार परिवर्तन मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** १ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील सातळी येथे शेतकरी-कष्टकरी-मजुर व तरुणांचा भव्य असा एल्गार मेळावा युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी शेतकरी नेते रविकांत तुपकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला होता. या मेळाव्यामध्ये सोयाबीन-कापसाची दरवाढ झाली पाहिजेत २२ जुलैला जी ढगफुटी झाली त्या ढगफुटी मुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले त्याची नुकसानभरपाई मिळाली पाहिजे व इतर काही मागण्या घेऊन एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.
सदर मेळाव्याव्या अगोदर शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना ग्रामस्थांनी घोड्यावर बसून त्यांची पुर्ण सातळी गावातुन जंगी अशी मिरवणूक काढली आणि त्यांनतर मेळाव्याला सुरूवात केली. या मेळाव्याला ग्रामस्थांनी व परीसरातील लोकांनी प्रचंड अशी उपस्थित दाखवली.

# दोन दिवसांपासून पाणी पुरवठा बंद

## भोकर पालिकेचा गलथान कारभार : नागरिकात संताप

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केल्याने शूध्दपाणी मिळते आहे. पालिकेतील प्रशाकाच्या हलगर्जीपणामुळे शहरात दोन दिवसांपासून पाणी पुरवठा बंद आहे. ऊन्हाळ्याच्या पुर्वाधातच नागरीकांना झळा सोसाव्या लागत आहेत. पालीकेच्या गलथान कारभारामुळे नागरीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.
शहराला प्रारंभी धानोरा तलावातून पाणी पुरवठा केला जात होता.अशूध्द पाण्यावरच नागरीकांना तहान भागवावी लागत असे.ऊन्हाळ्यात टॅंकरनी पाणी पुरवठा सुरू होता.याची दखल घेऊन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी वीस कोटि रूपयाची कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केली आणि शहर टॅंकरमुक्त झाले. आता नियमित शूध्द पाणी पुरवठा सुरू आहे. मागील अनेक दिवसांपासून पालिकेवर प्रशासकराज असल्याने नागरीकांच्या मूलभूत गरजांकडे कूणीच लक्ष द्यायला तयार नाही.अनेक कामे खोळंबली आहेत.ऊन्हाळ्याच्या पुर्वार्धातच शहरातील पाणी पुरवठा दोन दिवसांपासून बंद झाल्याने नागरीकांना पाण्यासाठी भटकावे लागत आहे. अचानक पाणी पुरवठा बंद झाल्याने नारीकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शहराला मागील अनेक वर्षांपासून लगत असलेल्या सुधा प्रकल्पातुन पाणी पुरवठा केला जातो.त्यासाठी लागणारी वीज हि कायमस्वरूपी जोडणी करण्यात आली आहे. येथील पालीका वेळोवेळी आपली थकबाकी भरणा करीत असते.आता पालीकेवर प्रशासक नियुक्त अधिकारी असल्याने थकबाकी भरण्यासाठी दूर्लक्ष केल्याने वीज वितरण विभागानी वीज पुरवठा खंडित केला आहे. परिणामी दोन दिवसांपासून शहराला होणारा पाणीपुरवठा बंद झाल्याचे समजते.



# सचिवालयात वॉल पोस्टरचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** तेलंगणा राज्यातील निर्मल जिल्हा ग्राम तिर्थक्षेत्र बासर येथे वसंतपंचमीनिमित्त तेलंगणा राज्याचे देवदाया शाखा मंत्री श्रीमती कोंडा सुरेखा यांच्या हस्ते सचिवालयात वालपोष्टर चे प्रकाशन करण्यात आले.
दक्षिण भारतातील एक मेव तेलंगणा राज्यातील निर्मल जिल्हा तिर्थक्षेत्र बासर येथे विद्या बुध्दी देणारी श्री ज्ञान सरस्वती मातेचे एक मेव मंदीर आसुन या ठिकाणी देश विदेशातुन भावीक भक्त मोठ्या प्रमाणात येत असतात. तसेच लहान मुलांना अक्षर अभ्यासाचे वळन लागावे म्हणून येथे अक्षर अभ्यासाला फार महत्त्व मानले जाते. याच पार्श्वभूमीवर दि १२ ते १४ या दोन दिवसीय कालावधीत वसंतपंचमी निमित्त धार्मिक कार्यक्रम चे आयोजन करण्यात आले आहे.
यावेळी बासर देवस्थान चे ऐडोमंट ऑफीसर विजय रामाराव, असिस्टंट ऐडोमंट सुदर्शन गौड, प्रधान पुजारी संजीवकुमार, वेदपंडीत नवीन शर्मा, देवदाया शाखा कमिशनर अनिलकुमार, आडिशनल श्रीमती ज्योती, वरंगल झोन उपकमीशनर श्रीकांत आदि मान्यवर उपस्थित होते.

# क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना पोलीस आयुक्तांच्या हस्ते पारितोषिक

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मोरे**

**चिखली :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत अमरावती विभागीय स्तरावर क्रिडा स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. त्यात बुलढाणा जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे. सदर स्पर्धेतील विजेत्यांना पोलीस आयुक्त रेड्डी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अमरावती विभागीय स्तरावर क्रिडा सपर्धेचे आयोजन करण्यात आले होते अनु जाती व नबबौद्ध मुला मुलींना क्रिडा विषयी आवड निर्माण होऊन त्यांना क्रिडा सर्धे मध्ये विकास व्हावा अनु.जाती जमातीचे विध्यार्धी राज्य स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळावी व आपल्या भारत देशाचा नाव लोकिक झाले पाहिजे यासाठी शासनानाने जिल्हास्तरावर व तालुकास्तवार नवोदय विद्यालयच्या स्तरावर शाळा सुरू केल्या आहेत या सर्व शाळांची जिल्हा स्तरावरून अमरावती विभागीय स्तरावरावर प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण सुनिल वारे साहेबांनी विविध क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्यामध्ये कोलवड वळती खामगाव शेगाव येथील बुलढाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. यावेळी विद्यार्थ्यांना अमरावती पोलिस आयुक्त रेड्डी साहेब यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. त्यामध्ये सहाय्यक आयुक्त समाजकल्याण बुलढाणा डॉ. अनिता राठोड ह्यांचे मार्गदर्शन लाभले. त्यासोबत मुख्याध्यापक नागसेन वाकोडे, शशिकांत जाधव व इतर सर्व बुलढाणा जिल्ह्यातील मुख्याध्यापकाचे मार्गदर्शन केले आहे बुलढाणा जिल्ह्यातील हे यश जिल्ह्याच्या यशात मोठे योगदान आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# नाशिक जिल्हा मजूर संघाच्या चेअरमनपदी रोहीत पगार बिनविरोध

## व्हा. चेअरमनपदी कविता शिंदे : कळवणमध्ये जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज



**कळवण :** नाशिक जिल्हा मजूर संस्थांचा सहकारी संघाच्याचेअरमनपदी युवा संचालक कळवणचे रोहीत पगार तर व्हाइस चेअरमनपदी सौं कविता शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कळवण नगराध्यक्ष कौतिक पगार यांचे रोहीत पगार हे सुपुत्र आहेत.

जिल्हा मजूर संघाचे तत्कालीन चेअरमन प्रमोद भाबड व व्हाइस चेअरमन सौं शर्मिला कुशारे यांनी राजीनामे दिल्याने रिक्त झालेल्या या पदासाठी शुक्रवारी संघाच्या कार्यालयात निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक संदीप जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची विशेष बैठक घेण्यात आली. बैठकीत चेअरमनपदासाठी रोहीत पगार यांच्या नावाची सूचना संचालक राजेंद्र भोसले यांनी, तर त्यास शिवाजी कासव यांनी अनुमोदन दिले. व्हाइस चेअरमनपदासाठी सौं कविता शिंदे यांची सूचना शिवाजी रौदंळ यांनी, तर त्यास संपतराव सकाळे यांनी अनुमोदन दिले. दोन्ही पदासाठी प्रत्येक एकच अर्ज दाखल झाल्याने, निवडणूक अधिकारी संदीप जाधव यांनी दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

नवनिर्वाचित चेअरमन रोहीत पगार यांचा आमदार नितीन पवार, भाजपा नेते केदा आहेर, संघाचे जेष्ठ संचालक राजेंद्र भोसले यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.जिल्ह्यातील मजूर संस्थांच्या हितासाठी व संवर्धनासाठी अडीअडचणी सोडविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे जेष्ठ संचालक राजेंद्र भोसले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार नितीन पवार जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष केदा आहेर, कळवणचे नगराध्यक्ष कौतिक पगार, कळवण बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, संघाचे जेष्ठ संचालक राजेंद्र भोसले, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष भूषण पगार, जेष्ठ नेते संपतराव सकाळे, प्रमोद भाबड, सौं शर्मिला कुशारे,शिवाजी कासव, प्रमोद मुळाणे,शिवाजी रौदळ, सतीश सोमवंशी,ज्ञानेश्वर लहाने,अमोल थोरे,सुरेश भोये, राजाभाऊ खेमणार,संजय चव्हाण, भारत कोकाटे,अर्जुन चुबंळे, राजेंद्र गावित,शशिकांत उबाळे,दीप्तीताई पाटील आदी उपस्थित होते. निवड जाहीर झाल्यानंतर पगार समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला.

जिल्हा मजूर संघाच्या चेअरमनपदी रोहीत यांची निवड झाल्याचे वृत्त कळवणमध्ये धडकताच फटाक्याची आतषबा करण्यात आली. यापूर्वी देखील रोहीत पगार यांचे वडील कळवणचे नगराध्यक्ष कौतिक पगार यांनी जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघाचे व्हा चेअरमनपद भूषिवले आहे. पगार यांचे कळवणमध्ये शुक्र वारी सायंकाळी शिवतीर्थावर आगमन झाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. यावेळी शहरातील विविध संस्था, संघटनाकडून चेअरमन पगार यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी भूषण पगार, राजेंद्र भामरे,राजेंद्र पवार हेमंत पाटील रविकांत सोनवणे बाजीराव खैरनार सुनील देवरे, नरेंद्र रौदंळ रवींद्र हिरे सुनील गांगुर्डे दीपक खैरनार हितेंद्र पगार विशाल वाघ रंजन देवरे राजेश पगार,पंकज पाचपिंड, दादा निकम अविनाश पगार अमित देवरे परेश कोठावदे सुधाकर खैरनार मयंक मोहीते निलेश आहेर संदीप पाटील आदी उपस्थित होते.

> जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांच्या हितासाठी आणि संवर्धनासाठी काम करेन .मजूर संस्थांच्या विविध अडचणी, ई निविदा शिवाय कामे मिळण्यासाठी व सदयस्थितीतील १० लाखाची मर्यादा वाढविण्यासाठी प्रयत्न करणार, त्याचप्रमाणे संस्थांच्या विविध अडचणींप्रश्नी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यासाठी प्राधान्य देईन .मजूर संघाचे प्रश्न मार्गी लावण्यास कटीबध्द राहील .
> **रोहीत पगार, चेअरमन जिल्हा मजूर संघ**



# शेतकऱ्याकडून नुकसाभरपाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**आत्माराम जाधव**

**जवळा (रिसोड) :** यावर्षीच्या सुरवातीपासूनच दुष्काळसदृश परिस्थितीने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. रब्बी हंगामातील पीक आतोनात खर्च करून कसेबसे जगविल्या जात आहे. मात्र वन्य प्राण्यांकडून उभ्या पिकाची नासाडी केली जात आहे. रिसोड तालुक्यातील आगरवाडी येथील शेतकरी पंडित साहेबराव वाकळे यांच्या एक एकर शेतातील उभ्या असलेल्या गव्हाची नीलागायीच्या कळपाने तुडवातुडव करून नासाडी केली आहे. सदर नुकसानीची भरपाई द्यावी अशी मागणी संबंधीत शेतकऱ्याने केली आहे.

तालुक्यातील बंदिसदृष भागात असलेल्या भर जहाँगीर शेतशिवारात सदर शेतकऱ्याचे शेत असून,हरीण, रानडुकर, नीलगायी आदी वन्य प्राण्यांचा हैदोस वाढल्यामुळे शेतातील उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यासाठी बरेच शेतकरी रात्रभर जागल करून पिकाची राखण करीत आहेत. परंतू न कळत जागलकऱ्यांचा डोळा लागल्यास वन्य प्राणी धुमाकूळ घालून पिकाची नासाडी करीत आहेत. त्यामुळे बरेच शेतकरी संकटात सापडले आहेत. या गंभीर बाबीकडे संबंधीत वन विभागाने लक्ष घालून वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे.

> **वन विभागाचे दुर्लक्ष :** पावसाअभावी यावर्षी खरिप हंगामातील पिकांनी शेतकऱ्यांची निराशा केली आहे .तर अवकळी पावसाने रब्बी हंगामातील तूर, हरभरा, आदी पिकांची वाट लागली आहे . त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली आहे . परिणामी आपसूकच गव्हाच्या पेऱ्यात कमालीची वाढ झाली आहे . सदर पीक जगविण्यासाठी डोंगराळ भागातील शेतकरी रात्री अपरात्री पिकाची राखण करीत आहेत . तरीसुध्दा वन्य प्राण्यांचा हैदोस सुरूच आहे . मात्र या गंभीर प्रकाराकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत आहे . वन विभागाने याची दखल घेऊन वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा व झालेल्या नुकसानीची पाहणी करून नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे .

# लोह्यात उद्या भव्य बौद्ध धम्म परिषद !

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरात प्रथमच 4 फेब्रुवारी 2024 रोजी बैल बाजाराच्या



मैदानावर भावी अशी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे तेव्हा या बौद्ध धम्म परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार सुधाकर श्रृंगारे यांच्या माध्यमातून संकल्पनेतून ही परिषद होणार आहे.त्या साठी नांदेड जिल्ह्याचे खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत तर भन्ते धम्मसेवक मुळावा, भन्ते खेमधम्मो मुळावा, भन्ते पय्यातीस्स सिरसाळा, भन्ते पय्यारत्न नांदेड, भन्ते मुतीतानंद परभणी, भन्ते बुद्ध कीर्ती रिसोड, भन्ते शिलरत्न नांदेड, भन्ते रेवतबोधी तेलंगणा, ह्या प्रमुख भंतेजींची धम्मदेशना होणार आहे सकाळी दहा ते बारा या वेळेत शाहीर गौतम पवार, अनिल तलवार, धम्मपाल सावंत अतुल गायकवाड, यांचा बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रम सकाळी ठीक अकरा वाजता धम्म ध्वजारोहण दुपारी बारा वाजता पूजनीय भिकू संघाची धम्मदेशना संध्याकाळी पाच वाजता जाहीर सभा व सत्कार समारंभ सायंकाळी सहा वाजता मंजुषा शिंदे पुणे, सपना खरात अकोला, यांच्या भीम गीत गाण्याचा कार्यक्रम रात्री आठ वाजता सिनेतारका सीमा पाटील आणि जॉली मोरे मुंबई यांच्या शाहिरी जलसा चा कार्यक्रम होणार आहे.

तरी सर्व श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका यांना दुपारी बारा वाजल्यापासून ते रात्री दहापर्यंत भोजन दान देण्यात येणार आहे तेव्हा या एकदिवसीय बौद्ध धम्म परिषदेला लोहा व कंधार मतदार संघातील सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान संयोजन समितीच्या वतीने माजी नगरसेवक छत्रपती धुतमल, सुधाकर कांबळे ,जेष्ठ कार्यकर्ते बालाजी खिलारे, रिपाईचे बालाजी धनसडे चंद्रमुनी मस्के ,माजी नगरसेवक उत्तम महाबळे, रिपाई चे सुरेश महाबळे, चांदु जाधव, सतीश निखाते, ॲड. दिगंबर गायकवाड, सुनील कांबळे, राजकुमार केकाटे, माधव कांबळे, मयूर कांबळे, भास्कर कदम, धोंडीबा सोनकांबळे राज कांबळे, नामदेव बुद्धे यांनी केले आहे.

# काँग्रेसकडून सावरकरांच्या पुतळ्याचे दहन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** स्वतःच्या सुटकेसाठी इंग्रजांकडे माफीनामा मागणाऱ्या आणि तुरुंगातील सुटकेनंतर स्वातंत्रलढ्याला विरोध करणाऱ्या सावरकारांचा विद्यापीठाकडून उदोउदो केला जात असल्याचा आरोप करीत युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांच्या नेतृत्वात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुख्यद्वारासमोर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिकात्मक पुतळ्याने दहन करण्यात आले. नागपूर विद्यापीठामध्ये शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. या कार्यक्रमांमध्ये भारतीय स्वातंत्रलढ्यात भाग घेणाऱ्या महापुरुषांना डावलून माफीनामा मागणाऱ्यांचा कार्यक्रम केला जातो असा आरोप कुणाल राऊत यांनी केला.

# महिला, बालविकासतर्फे 'संवाद योजना'

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी बालके बालगृहामध्ये राहत असतात. या बालकांना वन स्टॉप सेंटर आणि स्त्री आधार केंद्र येथील महिलांना आधार मिळावा आणि बालक व महिलांशी संवाद साधून प्रत्यक्ष वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी महिला व बालविकास आयुक्त यांच्या संकल्पनेतून जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनात संवाद योजना राबविण्यात येत आहे. याअंतर्गत बालकांचा शारीरिक, मानसिक विकास व्हावा हा योजनेचा उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील प्रत्येक कर्मचारी महिन्यातून एक दिवस बालगृहात निवासी थांबणार आहे. महिला कर्मचारी मुलींचे बालगृह, स्त्री आधार केंद्र तर पुरुष कर्मचारी मुलांचे बालगृह येथे निवासी राहतील. येथील महिला व बालकांची हितगुज करत महिला व बालक राहत असलेल्या संस्थेतील राहण्याची व्यवस्था, जेवण, स्वच्छता, आरोग्य विषयक काळजी आणि सोयी सुविधा व त्यांना येणाऱ्या अडचणी जाणून त्यावर उपाययोजना करणार आहेत.

बालगृहात राहणाऱ्या बालकांचे शारीरिक आणि मानसिक विकासाबाबत सर्व कर्मचाऱ्यांना जबाबदारी घ्यायची आहे. सदर उपक्रमामध्ये जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड लाईन, वनस्टॉप सेंटर आदी कर्मचारी सहभागी होणार आहेत. असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी कळविले आहे.

# चंद्रपूर शहरात मुसळधार; जनजीवन विस्कळित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात शुक्रवारी पहाटे पाच वाजताच्या सुमारास अचानक मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळित झाले. सर्व प्रमुख मार्गावर पाणी साचले आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात थंडीचा गारवा हळूहळू कमी होत असताना गुरूवारी सायंकाळी आठ वाजता पावसाचे हलके थेंब सुरू झाले होते. मात्र पाऊस पडला नाही. पहाटे पाच वाजताच्या सुमारास अचानक मुसळधार पाऊस सुरू झाला. जवळपास अर्धा तास हा मुसळधार पाऊस सुरू होता. या पावसामुळे पहाटे व सकाळी फिरायला जाणाऱ्यांची गैरसोय झाली. शहरातील सर्व प्रमुख मार्गावर पावसाचे पाणी साचले होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# बल्लारपूर शहरात वाळू विक्री कायदेशीर की बेकायदेशीर : रविकुमार पुप्पलवार

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गहलोत**

**चंद्रपूर :** आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष रविभाऊ पुप्पलवार यांचे अधिकाऱ्यांपुढे सवाल उपस्थित केला आहे कि, तीन-चार महिन्या पासून बल्लारपूर शहरात घर बांधकामासाठी मुबलक प्रमाणात वाळू मिळत नाही आहे, अनेक नागरिकांच्या घरांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत दिसून येत आहे. घराचं बांधकाम करणारे मालक आणि बांधकाम कंत्राटदार व मजूर या वाळू पुरवठाच्या समस्येने त्रस्त आहेत. गावात कायदेशीर वाळू उपलब्ध नसून अवैध वाळू मात्र मुबलक प्रमाणात मुबलक दरात उपलब्ध कशी होत आहे?, असा प्रश्न देखील पुप्पलवार यांच्या माध्यमातून उपस्थित केला जात आहे. शहरात आजकाल एक टाटा एस भरून अवैध वाळू तीन ते चार



हजार रुपया दरात विक्री केली जात आहे. बल्लारपूर शहरातील जनते समोर "मरता क्या ना करता" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, तरी बल्लारपूर शहरातील तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पोलीस प्रशासन आणि संबंधित अधिकारी या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. बांधकामासाठी जनतेला कायदेशीर वाळू उपलब्ध करून देण्याची तरतूद कोण करणार याकडे दुर्लक्ष करण्याचे कारण काय? शहरात अवैध वाळू विक्रीला कोण प्रोत्साहन देत आहे? शहरात अवैध वाळू कोठून येत आहे? कोणाद्वारे याचा पुरवठा केला जात आहे , हे अधिकाऱ्यांना माहीत नाही का? आज प्रत्येक सामान्य माणसाच्या मनात हा प्रश्न पडतो आहे. अशाप्रकारे शहरातील तसेच आसपासच्या परिसरातील रेती समस्येबाबत आपचे शहराध्यक्ष रविकुमार पुप्पलवार यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

# 10 फेब्रुवारीला 'रन फॅार लेप्रसी'चे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2024 या पंधरवाड्यात 'स्पर्श'- कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. यात विविध आरोग्य शिक्षण उपक्रम राबविण्यात येणार असून 10 फेब्रुवारी रोजी 'रन फॅार लेप्रसी मॅरेथॉनचे' आयोजन गांधी चौक ते जनता कॉलेज व परत गांधी चौक या मार्गाने करण्यात आले आहे. या उपक्रमात नागरिकांनी उत्फुर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलींद कांबळे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, मनपाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वनिता गर्गेलवार आदी उपस्थित होते. 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत विविध शाळांमध्ये प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, कुष्ठरोगावरील गाणी, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा व पथनाट्याचे आयोजन करण्यात येणार असून विजेत्या स्पर्धकांना बक्षिस व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. 'कलंक कुष्ठरोगाचा मिटवू या, सन्मानाने स्वीकार करूया' हे यावर्षीच्या स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाचे घोषवाक्य आहे.

# राजमाता जिजाऊ आश्रमशाळेत स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरूळ ता.खुलताबाद येथील राजमाता जिजाऊ प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वेरुळ तांडा येथे स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात साजरे करण्यात आले. ह्या कार्यक्रमात स्वप्न पूजा शिक्षण संस्था संभाजीनगर यांच्या अध्यक्ष छायाताई जंगले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेच्या उपाध्यक्षा प्रोफेसर श्रीमती पल्लवी काळवाघे मॅडम या सुद्धा कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होत्या. या कार्यक्रमात ग्रामपंचायत सदस्य सुरेश ठाकरे व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीरित्या पार करण्यासाठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री एस बी चोपडे व प्राथमिक विभागाचे विजयसिंह ठाकूर, व वसतिगृहाचे अधिक्षक निवृत्ती जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती लोंढे मॅडम व श्री आर एस पाटील यांनी केले व कार्यक्रमाचा निरोप समारंभ श्री ठाकूर सर यांनी केले.





# सप्तर्षी प्रभागसंघाची वार्षिक सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** ३१ जानेवारी रोजी सप्तर्षी प्रभाग संघ वडशिंगी वार्षिक सर्वसाधारण सभा खेर्डा खु प्रभाग संघाच्या अध्यक्षा सौ.रूपाली माटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

सभेसाठी सचिव सत्यभामा वाघ ,कोष्याध्यक्ष रुक्मिणी मऱ्हे सरपंच चव्हाण ताई,शालिनी दामोदर तसेच प्रभाग संघाला जुडलेले सर्व ग्रामसंघातील पदाधिकारी उपस्थित होते.सभेला प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी धिरज वाकोडे साहेब , मिलिंद डोंगरदिवे सर उपस्थीत होते, धिरज वाकोडे साहेब यांनी महिलांना PMFME तसेच कृषी खात्याशी निगडित इतर योजनांची माहिती दिली, प्रभाग संघाच्या आर्थिक लेखाजोखा चे वाचन प्रभागसंघाच्या लेखापाल उर्मिला जाधव यांनी केले ,मिलिंद डोंगरदिवे यांनी महिलांना प्रभाग संघाचे पुढील वर्षीचे आर्थिक आणि सामाजिक नियोजन कसे करता येइल या बद्दल मार्गदर्शन केलें कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा काळे ताई व कांता वानखडे ताई यांनी केले, प्रास्ताविक सौ. सोनम आठवले ताई यांनी केले तसेच आपल्या तालुका कक्षातील तालुका व्यवस्थापक विनोद शेगोकार, प्रभाग समनवयक अमोल वैराळे , अनिल कफनकर सुबोध खोब्रागडे उपस्थीत होते . तालुका व्यवस्थापक विनोद शेगोकार यांनी समुहानी अभियानाच्या दशसुत्री चे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.समुदाय संसाधन संस्था नी आपल्या महिलांच्या उपजीविका वाढविण्यासाठी नियमित प्रयत्न केले पाहिजे असे सुचविले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. संगीता पुंडे यानी केलें .प्रभागसंघ अध्यक्षा रुपाली माटे यानी सर्व ग्राम संघाचे पदाधिकारी आणि महीला उपस्थीत असल्याबद्दल त्यांचें आभार व्यक्त केले हीच उपस्थिती प्रभाग संघाच्या मासिक सभेला पण उपस्थिती असावी असे सुचविले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व कॅडर, सर्व ग्रामसंघ लिपिक , सर्व ग्राम संघ पदाधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ६०० ग्रॅम सोने, ३० किलो चांदी जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात काही दिवसांपूर्वी कुरिअर वाहनावर पडलेल्या दरोड्यातील आणखी ६०० ग्रॅम सोने व ३० किलो चांदी हस्तगत करत आरोपींच्या वाहन चालकास चांदवड येथून अटक करण्यात आली आहे. मुंबई येथील जय बजरंग कुरिअर सर्व्हिसच्या वाहनावर इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात पाच ते सहा संशयितांनी दरोडा टाकला होता. या वाहनातून सोने आणि चांदीच्या दागिन्यांची वाहतूक करण्यात येत होती. दरोड्यात साडेचार किलो सोन्याचे दागिने, बिस्कीट आणि १३५ किलो चांदीचे दागिने व विटा याप्रमाणे तीन कोटी ६७ लाख ५५ हजार रुपयांच्या मुद्देमालाची लूट करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा आणि घोटी पोलिसांनी आग्रा जिल्ह्यातील खेरागड, इटौरा परिसरातून देवेंद्रसिंग उर्फ करवा परमार, आकाश परमार, माजी सैनिक हुबसिंग ठाकूर, फळ विक्रेता शिवसिंग ठाकूर, माजी सैनिक जहिर खान यांना मागील आठवड्यात ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २.५ किलो सोन्याचे दागिने आणि ४५ किलो चांदीचे दागिने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संशयितांना न्यायालयाने नऊ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. या गुन्ह्यातील तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखा तसेच घोटी पोलिसांचे पथक आग्रा येथे पुन्हा गेले होते.

# रुग्णवाहिका महाघोटाळा थांबवा; अन्यथा लाक्षणिक उपोषण

## वडेट्टीवार : घोटाळयासंदर्भात पत्र देऊनही सरकार गप्प

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सरकारी ॲम्ब्युलन्समधून पैसे कमावण्याचा उद्योग सरकार बंद करण्याच्या मनःस्थितीत नाही. मंत्र्यांच्या नातेवाईकाचा, खास ठेकेदाराचा खिसा भरण्यासाठी सरकारचा आटापिटा सुरुच आहे. या महाघोटाळ्यात सत्ताधीशाच्या पुत्राचा हात असल्याचा संशय देखील बळावतो आहे. याबाबत सरकारकडे पत्राद्वारे तक्रार करून, पत्रकार परिषदेतून आवाज उठवून देखील गेंड्याच्या कातडीचे सरकार कोणतीही कारवाई करत नाही. त्यामुळे हा ऍम्ब्युलन्स महाघोटाळा थांबवला नाही तर मंत्रालयाजवळील गांधी पुतळ्यासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार असल्याचा इशारा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार दिला आहे.

वडेट्टीवार म्हणाले, राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आपत्कालीन ॲम्ब्युलन्स सेवेच्या (DAIL 108) टेंडरचे गौडबंगाल सुरूच आहे. हे टेंडर आता दोन ठेकेदारांना विभागून देण्याची शक्कल लढवली




जात आहे. नव्या टेंडरनुसार ठेकेदारास वार्षिक सुमारे ७५० कोटी रुपये तर १० वर्षांपोटी सुमारे ९ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. प्रत्यक्षात ठेकेदाराची एकावेळची गुंतवणूक फक्त ८०० कोटींच्या घरात आहे. मात्र, प्रशासनावर दबावतंत्र वापरून टेंडरचे आकडे दुप्पटीपेक्षा अधिक फुगवण्यात आले आहेत. रुग्णवाहिका महाघोटाळा समोर आल्यावर आम्ही आवाज उठवला. परंतु सत्ताधीशाच्या पुत्राच्या मर्जीतील खास ठेकेदाराला, मंत्र्याच्या नातेवाईकाला काम देण्यासाठी सरकार कोणतीही कारवाई करत नाही. केंद्रीय दक्षता आयोगाच्या नियमाला बगल देऊन सरकारचा घोटाळा सुरु आहे.

विशिष्ट कंपनीलाच हे टेंडर द्यायचे हे ठरवून प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ठेकेदाराचा या क्षेत्रातील कामाचा कोणताही पूर्वानुभव नाही, तसेच इतके मोठे काम करण्याची त्यांची आर्थिक क्षमता नाही, तरी त्यांच्यासाठी लाल गालिचा सरकारने अंथरला आहे. त्यासाठी 'स्पेन'स्थित बहुराष्ट्रीय कंपनीची मदत घेतली जात आहे. तांत्रिक बाबींचा आधार घेतला जात आहे. दोनदा नव्याने टेंडर, तीनदा मुदतवाढ अशी पळवाट शोधून शेवटी हे टेंडर विशिष्ट कंपनीलाच दिले जाणार आहे. टेंडरचे दोन भाग करून दोन ठेकेदारांना हे टेंडर विभागून चालवायला दिले जाणार आहे. टेंडरच्या आयडीचेही गौडबंगाल आहे. एकाच टेंडरचे दोन आयडी असल्याची माहिती समोर आहे. याचा शोध घेतल्यास या टेंडरमधील अनागोंदी आणखी चव्हाट्यावर येईल, अशी शक्यता आहे. परंतु सरकारच्या आशीर्वादाने हा महाघोटाळा सुरु असल्याने यावर कोणतीही कारवाई होईल, असे वाटत नाही. त्यामुळे हा ऍम्ब्युलन्स महाघोटाळा सरकारने थांबविला नाही तर मंत्रालयाजवळील गांधी पुतळ्यासमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार असल्याचा इशारा वडेट्टीवार दिला आहे.

# देशाचा शाश्वत व सर्वसमावेशक विकास साधणारा अर्थसंकल्प

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** देशाच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला जी सितारमन यांनी सन 2024-25 करीता संसदेत सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पातून देशाला विकसीत राष्ट्रांच्या रांगेत आणण्याचे ध्येय अंतर्भूत असून हे अर्थसंकल्प गरीब, महिला, युवक व बळीराजाला समर्पित असून या अर्थसंकल्पाद्वारे माननिय मोदी सरकारच्या 'सर्वांची साथ, सर्वांचा विकास व सर्वांचा विश्वास' या धोरणाशी सुसंगत असल्याची प्रतिकीया राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी या अर्थसंकल्पावर व्यक्त केली आहे. देशातील पायाभूत सुविधांसाठी 11.11 लक्ष कोटींची तरतूद विकासाला नवी दिशा देणारी ठरेल 7 लक्ष रूपये वार्षिक उत्पन्नावर करदात्यांना करसुट देण्यात आली असल्याने मोठ्या संख्येतील लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. गेल्या 10 वर्षात सरकारने 390 कृषी विद्यापीठ, 7 आयआयटी, 7 आयआयएम व 3 हजारहून अधिक आयटीआय संस्थांची उभारणी केली. जीएसटीमुळे एक देश एक बाजार ही संकल्पना यशस्वीपणे साकार करण्यात सरकार यशस्वी ठरले. महिला सशक्तीकरण, ग्रामिण महिलांना 70 टक्के घरे, शेती क्षेत्रातून 3 लक्ष कोटीचा व्यापार, 80 कोटी लोकांना मोफत शिधा देण्यात सरकार सफल झाले आहे. युवकांना सुवर्णकाळ लाभण्यासाठी 50 वर्षांसाठीच्या बिनव्याजी कर्ज योजनेसाठी 1 लक्ष कोटीची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. अर्थव्यवस्थेला गती देण्यास 517 नवीन विमानमार्ग प्रस्तावित केले आहे. नव्या वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना 9 ते 14 वर्षीय मुलींसाठी गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधासाठी लस, सोलर पॅनलद्वारे 1 कोटी घरांना महिनाभरात 300 युनिट मोफत विज पुरविण्याचे धोरण, आशा सेविकांना आयुष्यमान भारत योजनेचा लाभ, उच्च शिक्षणात महिलांचा टक्का वाढविण्याचे धोरण, मुद्रा योजनेतून महिला उद्योजकांना 30 कोटी कर्ज वितरण, देशात गोदामांची उभारणी, किसान संपदा योजनेतून 38 लक्ष शेतकऱ्यांना लाभ देण्याचे धोरण, 5 वर्षात ग्रामिण क्षेत्रात 2 कोटी घरांची उभारणी करण्याचा मनोदय सरकारने या अर्थसंकल्पातून व्यक्त केला असून अमृत कालात शास्वत व सर्वसमावेशक विकास, उत्पादकतेत वृध्दी संसाधनात गुंतवणूक हे सरकारचे धोरण शक्तीशाली अर्थव्यवस्थेला चालना देणारे असल्याचे हंसराज अहीर यांनी म्हटले आहे.

# रामायणातील एकेका पात्रातून जीवन प्रणालीची ओळख : मंत्री सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** भव्य सेट, आकर्षक देखावे, विद्युत रोषणाई व डोळ्याचे पारणे फेडणारे महाकाव्य रामायणातील प्रसंग यांनी अक्षरशः उपस्थितांना मोहिनी घातली. गीत, नाट्य, नृत्य आणि वादनाच्या माध्यमातून रामायणातील एकेका प्रसंगाचे सादरीकरण होत गेले आणि रसिक या रामायण भक्तीत हरवून गेले. दरम्यान, रामायण हे नवीन पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देते. रामायणातील एकेक पात्र जीवन प्रणाली सांगणारे आहे, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने महाकाव्य रामायण या कार्यक्रमाचे आयोजन गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, रामायण मालिकेतील श्रीरामांच्या भूमिकेने प्रसिद्ध अभिनेते अरुण गोविल, आनंद माडगूळकर, अभिनेत्री रवीना टंडन, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती. महाकाव्य रामायण या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांनी पुन्हा एकदा ग.दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून आणि स्व. सुधीर फडके (बाबूजी) यांच्या आवाजातून अजरामर झालेल्या गीतरामायणातील विविध प्रसंगांतील गीतांचे सादरीकरण प्रत्यक्ष अनुभवले. स्वयें श्रीराम प्रभू ऐकती, दशरथा घे हे पायसदान, राम जन्मला ग सखे, चला राघवा चला, स्वयंवर झाले सीतेचे..अशा एकेका अजरामर गीतांचे सादरीकरण यावेळी झाले त्याला रसिकांनी मनापासून दाद दिली. यावेळी बोलताना मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, ४९६ वर्षांच्या संघर्षानंतर २२ जानेवारी रोजी श्रीरामाची अयोध्या येथे पुनर्प्रतिष्ठापना झाली. त्यासाठी महाराष्ट्राचे योगदान लाभले, ही भाग्याची गोष्ट. मंदिरातील महाद्वारासाठी लागणारे लाकूड (काष्ठ) हे चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. रामायणातील जटायू हे महत्वाचे पात्र आहे. त्या जटायू संवर्धनासाठी आपण नाशिक, ताडोबा आणि पेंच येथे तीन जटायू संवर्धन केंद्रे सुरू केली आहेत. रामायणातील एकेक पात्र जीवन प्रणाली सांगणारे आहे. संकटातून सावरण्याचे बळ प्रभू श्रीराम देतात, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. दिनांक २१ ते २५ फेब्रुवारी रोजी खारघर येथे अश्वमेध यज्ञ आयोजित केला असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले की, नवीन पिढीपर्यंत आपली संस्कृती पोहोचवण्याचे काम अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे, ही अतिशय चांगली बाब आहे. आनंद माडगूळकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. गीतरामायणाच्या आठवणी खूप आहेत. दिवसेंदिवस गीतरामायणाची लोकप्रियता वाढत आहे ही चांगली गोष्ट आहे. रामायणाची तत्व आपल्या सर्वांच्या जीवनात भिनली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाचे प्रधान सचिव श्री. खारगे यांनी केले. सांगीतिक असा कलाविष्कार गीत रामायणाच्या माध्यमातून पाहायला मिळते. हा कार्यक्रम म्हणजे भारतीय संस्कृतीचे प्रकटीकरण आहे, असे ते म्हणाले. यावेळी अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती देऊन उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक चवरे यांनी मानले. या महाकाव्य रामायण सांस्कृतिक कार्यक्रमात श्रीरामांच्या भूमिकेत अभिनेता ललित प्रभाकर, सीतामाईच्या भूमिकेत अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि लक्ष्मणाच्या भूमिकेत शुभंकर परांजपे या कलाकारांनी सादरीकरण केले. तीनशेहून अधिक कलाकारांनी उत्तमोत्तम सादरीकरण करून रसिकांना खिळवून ठेवले.

# गोल पुलियाची वाहतूक सुरू करण्याच्या मागणीसाठी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारपूर शहरातील महत्वाचा मार्ग असलेला रेल्वेचा गोल पुलियामधून वाहतूक सुरू करण्याच्या मागणीसाठी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे व चेतन गेडाम युवा कांग्रेस महासचिव यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी रेल्वे रोको आंदोलन करण्याच्या पर्यतनात असून त्यांच्या आंदोलनाचा अखेर यश आले आहे.दरम्यान हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे.मात्र पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन तुटली असून ती देखील तात्काळ दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

बल्लारपूर शहरातील वस्ती भाग हा अत्यंत महत्वाचा असून अर्धे शहर या ठिकाणी वास्तव्यास आहे.परिणामी मागील 18 दिवसांपासून गोल पुलियाची वाहतूक बंद करम्यात आली असून शाळकरी विद्यार्थी, अंत्यसंस्कार साठी जाणारे नागरिक तथा लहान व्यावसायिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता.त्यामुळं तात्काळ हा मार्ग रहदारीसाठी खुला करावा अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा राजू झोडे यांनी दिला होता. त्यानंतर नागरिकांनी रेल्वे मार्ग रोखुन धरला. त्यामुळं काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती.

यावेळी तहसीलदार ,पोलीस प्रशासन,जी आर पी पोलिस, पाणी पुरवठा अधिकारी व रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन राजू झोडे व नागरिकांसोबत चर्चा केली.अखेर रेल्वे प्रशासनाने गोल पुलियाची वाहतूक सुरू करण्याचे आश्वासन देताच हे आंदोलन मागे घेण्यात आले.यावेळी संपत कोरडे, चेतन गेडाम, श्यामभाऊ झिलपे, बिलू गुप्ता, विशाल सातपुते, मोहम्मद पठान, बालकृष्ण कडेल, सुनिल मोतिलाल आदि नागरिक उपस्थित होते.





# दीपक पाटील वाढाई यांची चंद्रपूर जिल्हा किसान काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** काँग्रेसचे सक्रिय जेष्ठ कार्यकर्ते आणि ओबीसी सेलचे राज्य उपाध्यक्ष माननीय दीपक पाटील वढई यांची महाराष्ट्र राज्य काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटेल तथा किसन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माननीय पराग पाष्टे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. 2014 पासून काँग्रेसचे दीपक पाटील वाढई हे गेल्या दहा वर्षापासून काँग्रेसचे सक्रिय सदस्य आहेत आणि त्यांनी पक्षांमध्ये विविध पदे भूषविली. आणि गेल्या सहा महिन्यापासून ते ओबीसी सेल काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते मुल तालुक्यातील एक सक्रिय काँग्रेसचे सदस्य म्हणून त्यांनी बेंबाळच्या गेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये मागील दहा वर्ष भाजपाच्या ताब्यात असलेली ग्रामपंचायत एक हाती निवडून आणून आपल्या नेतृत्वगुणाची चुणूक दाखवून दिली. किशन काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी निवडणूक झाल्याबद्दल सर्व काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांतर्फे त्यांचे अभिनंदन केल्या जात आहे.

माननीय दीपक पाटील वाढई यांनी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटेल तसेच जिल्हाध्यक्ष आमदार सुभाषभाऊ धोटे यांच्या नेतृत्वामध्ये काँग्रेसला येत्या काळात भरभराटीचे दिवस आणण्यासाठी काम करण्याचे मनोगत व्यक्त केले.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर